CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १८ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २२८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## दिल्लीचा पंजाबवर १५ धावांनी विजय

लखनऊ : दिल्लीने पंजाबवर १५ धावांनी विजय मिळवला आहे. दिल्लीने दिलेल्या २१४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबचा संघ आठ विकेटच्या मोबदलयात १९८ धावांपर्यंत मजल मारु शकला. पंजाबकडून लियाम लिव्हिंगस्टोन याने एकाकीही झुंज दिली. लियाम लिव्हिंगस्टोन याने ९४ धावांची वादळी खेळी केली. त्याशिवाय अथर्व तायडे यानेही संयमी अर्धशतक झळकावले. दिल्लीने पंजाबचा पराभव करत यंदाच्या हंगामातील पाचव्या विजयाची नोंद केली. दिल्लीचा संघ १० गुणावर पोहचलाय. दिल्लीविरोधातील पराभवामुळे पंजाबचे प्लेऑफचे आव्हान खडतर झालेय. पंजाबचा एक सामना बाकी आहे, त्या सामन्यात जरी विजय मिळवला तरी ते १४ गुणांपर्यंत मजल मारतील. त्यामुळे इतर संघाच्या कामगिरीवर पंजाबचे प्लेऑफचे आव्हान अवलंबून असेल.

### आयपीएल सामना क्र.६५

Vs

हैद्राबाद विरुद्ध बेंगलोर

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : हैद्राबाद

# मुलीशी लग्न लावून दे, म्हणून आईकडे लावला तगादा

## ▪ वकीलमामाला पिस्तूलचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी

सुराज्य/मोहोळ

**अल्पवयीन मुलीचे माझ्यासोबत लग्न लावून दे, तुलाही आणि तुझ्या मुलीलाही मी सांभाळतो आणि सिनेमामध्येही काम देतो, असे म्हणून वकिलाच्या बहिण व भाचीला बळजबरीने घरामध्ये ठेवून वकील आणि त्यांच्या मामेभावाला मारहाण करून पिस्तुलाचा धाक दाखवून धमकी दिल्याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये चौघांविरुध्द जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेली आहे माहितीनुसार गेवराई येथील वकील असलेले शरद भीमराव ठोंबरे यांच्या बहिणीशी मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रूक येथील सद्दाम रशीद ऊर्फ हुसेन शेख (सध्या रा.तुळजापूर रोड) याचे सोबत मागील एक वर्षापासून कामाच्या निमित्ताने ओळख झाली होती. मागील सहा महिन्यापूर्वी शेख यांने तुझ्या बहिणीच्या मुलीला पिक्चर मध्ये काम देतो, असे सांगून तिची मुलगी व मुलगा यांना शेख याने स्वतःच्या घरी आणून ठेवले होते. त्यानंतर काही कालावधीनंतर तुझ्या मुलीचे माझ्यासोबत लग्न लावून दे, असे म्हणून तो मुलीच्या आईच्या पाठीमागे लागला होता परंतु मुलगी अजून लहान होती. त्यामुळे आई त्या गोष्टीस तयार नव्हती. त्यानंतर एक वर्षाच्या काळात त्यांने त्यांना घरामध्ये बंदिस्त केले होते.

बाहेर येण्या-जाण्यास व वावरण्यास मज्जाव केला होता. परंतु मुलीची ८ वीची परीक्षा असल्याने तिने त्या मुलीस गावाकडे पाठवले होते मुलीची परीक्षा संपल्यानंतर तिला घेऊन येते, म्हणून आई ही गावाकडे परत आली आणि तिने आपल्या भाऊ शरद भीमराव ठोंबरे यास संपूर्ण माहिती सांगितली. ते व्यवसायाने वकील असल्याने त्यांनी संपूर्ण हकिकत ऐकून घेतली. दरम्यान या महिलेला फोनवरून वारंवार सद्दाम रशीद ऊर्फ हुसेन शेख वारंवार धमकी देत होता व शिवीगाळ करून तुला तुझे घरातून घेऊन जाईन माझ्यासोबत आली नाहीस तर तुला व तुझ्या मुलीला जिवे ठार मारीन, अशा प्रकारची धमकी देत होता. हा सारा प्रकार महिलेने आपला भाऊ शरद ठोंबरे यांना सांगितला.

याबाबत महिलेचा वकील भाऊ शरद ठोंबरे यांनी सद्दाम शेख यास फोन लावून तू माझ्या बहिणीला व भाचीला का त्रास देतो असे, विचारले असता तुम्ही मला भेटायला सोलापूरला या मी तुम्हाला सर्व काही सांगतो. माझे ऐकून घ्या, त्यानंतर मी त्यांना अजिबात त्रास देणार नाही, असे सद्दामने सांगितले. यावर विश्वास ठेवून शरद ठोंबरे हे आपला मामेभाऊ विनोद मुंडे हे सोलापूर येथे तुळजापूर रोडवर राहण्यास असल्याने १६ मे रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास तुळजापूर रोडवर असलेल्या सद्दामच्या घरी भेटण्यासाठी आले. त्याठिकाणी सद्दाण पांढरा रंगाच्या वेरणा कारमध्ये आला. त्यावेळी त्याच्यासोबत आणखी एक पांढरा रंगाची झायलो गाडीत इतर तिघेजण अनोळखी इसम सोबत आले होते. ठोंबरे व त्याचा मामेभाऊ मुंडे यांची भेट झाल्यानंतर शेख याने सांगितले की, आता खूप उशीर झाला आहे, तुम्ही आज रात्री माझ्या घरी मुक्काम करा, उद्या सकाळी घरी जावा असे म्हणून त्यांना सद्दाम यांने आपण थोडे बाहेर जाऊन येऊ, असे सांगितले व कारमध्ये बसवले. त्यांना पुणे रोडवरील एका हॉटेलमध्ये नेऊन जबरदस्तीने दारू पाजली. त्यांना परत सोलापुराला आणत असताना वकील ठोंबरे व मुंडे यांनी संधी साधून चालत्या कारमधून उडी टाकून पोलीस ठाणे गाठले.



### संधी साधून कारमधून दोघांनी उडी टाकली..!

वकील शरद ठोंबरे व विनोद मुंडे यांना सद्दाम यांने कारमधून सोलापूर मोहोळ दरम्यान सावळेश्वरजवळ असणाऱ्या हॉटेल रॉयल इन या ठिकाणी आणले व बळजबरीने दारू पिण्यास भाग पाडले. नंतर त्यांना शिव्या देऊन मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने ठोंबरे यांचा गळा हाताने जोरात दाबला व सिल्वर रंगाची बंदूक त्यांच्या डोक्याला लावली. तुला आता जिवंत सोडणार नाही, असा दम भरला. नंतर सद्दाम व त्याच्या साथीदारांनी यांना जबरदस्तीने बंदुकीचा धाक दाखवून कारमध्ये बसवून गाडी परत सोलापूरच्या दिशेने आणली. गाडीचा स्पिड कमी झाल्यानंतर ठोंबरे यांनी चालत्या कारमधून बाहेर उडी टाकली. बाजूलाच पोलीस असल्याने त्यांनी पोलिसांचे संपर्क साधून मोहोळ पोलीस ठाणे गाठले. तर त्यांचा मामेभाऊ मुंढे यास मेन रोडवर कार येताच संधी साधून उडी टाकली आणि जवळ असलेल्या महेश ढाबा या ठिकाणी जाऊन पोलिसाशी संपर्क साधला.

## अक्कलकोटमध्ये तरुणाची अज्ञात कारणावरुन गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/अक्कलकोट



रामपूर (ता.अक्कलकोट) येथील कै.श्रीकांत उर्फ विद्या इरणा बिराजदार (वय २८ वर्षे) हा अज्ञात कारणावरून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही घटना दि.१८ मे रोजी सकाळी घडली आहे.

याबाबत दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीकांत हा मागील काही वर्षांपासून ग्रामपंचायत कार्यालयात कॉम्प्युटर ऑपरेटर म्हणून काम पाहत होता. त्याच लग्न ठरलं होतं.

येत्या रविवारी २१ मे रोजी विवाह होणार होता. अचानकपणे स्वतःच्या शेतातील कडुलिंबाच्या झाडाच्या फांद्याला दोरीने गळफास घेऊन जीवन संपवला आहे.त्याच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. तो सरपंच शोभा बिराजदार यांचं मुलगा होता.

## एसटीचे पहिले वाहक केवटे यांचा जीवनप्रवास थांबला

सुराज्य/पुणे



राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटींचे पहिले वाहक लक्ष्मण केवटे यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. ते ९९ वर्षांचे होते. बुधवारी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.

यंदाच्या एक जून रोजी पहिल्या एसटी प्रवासाला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यापूर्वीच केवटे यांचे निधन झाल्याने एसटीच्या इतिहासाचा साक्षीदार काळाच्या पडद्याआड गेला असल्याची भावना व्यक्त होत आहे. गुरुवारी अहमदनगर येथील अमरधाम येथे सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

राज्यातील पहिली एसटी बस सेवा १९४८ मध्ये अहमदनगर ते पुणे दरम्यान सुरू करण्यात आली. त्या काळी नगर शहर फार लहान होते. प्रवासी बससेवा नसल्याने बसस्थानक असे नव्हतेच. खासगी बस माळीवाडा परिसरातून बाहेरगावी जात असत. याच परिसरातून पहिली बस पुण्याकडे धावली. त्यावेळी देखील खासगी अवैध प्रवासी वाहतूक होत असे त्यांच्याकडून ही एसटीला अडथळे आणण्याचे प्रयत्न होत असे, जाणकार सांगतात. अहमदनगर ते पुणे या पहिल्या बसचे चालक आणि वाहक दोघेही अहमदनगरचे होते. एसटीचे वाहक म्हणून केवटे आणि चालक म्हणून राऊत यांच्याकडे जबाबदारी होती.

## सहकार शिरोमणीत दाखल्यावरून राडा

### आडवा-आडवीच्या राजकारणामुळे इच्छुक वैतागले

सुराज्य/पंढरपूर

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अत्यंत चुरशीने होत असताना आता दाखले आडवा आडवीचे राजकारण सहकार शिरोमणी आणि विठ्ठल कारखान्यामधून सुरू झाले आहे.

निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी लागणारे येणे बाकी दाखला मिळावा यासाठी इच्छुक उमेदवार सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्यावर हेलपाटे मारत आहेत. मात्र कारखान्याकडून विरोधकांना येणे बाकी दाखला वेळेवर दिला जात नाही असा आरोप करत इच्छुक उमेदवारांनी कारखाना कार्यस्थळावर चांगलाच राडा घातला. यामुळे वातावरण चांगलेच तापले होते. इच्छुक उमेदवार आणि कर्मचाऱ्यांची बाचाबाची सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती. अनेक मातब्बर नेते कारखाना स्थळावर ठिय्या मांडून बसले होते. मात्र त्यांना कोणतेही प्रकारचे दाखले देण्यात आले नाहीत. त्यामुळे नेत्यांना गेल्या दोन-तीन दिवसापासून रिकाम्या हातीच परतावे लागत आहे.



> आतापर्यंत ९१ दाखले देण्यात आले आहेत. कल्याणराव काळे यांच्यासह ३० दाखल्याची तपासणी सुरू आहे. कल्याणराव काळे यांचे १९९५ पासूनचे रेकॉर्ड तपासणी सुरू आहे. छाननी पूर्वी सर्वांचे दाखले देण्यात येतील.
>
> **- दत्तात्रय गायकवाड,**
> कार्यकारी संचालक, विठ्ठल कारखाना, पंढरपूर

सहकार शिरोमणी कारखान्याने घेतलेली भूमिका पाहता त्याच्याशी संलग्न असणाऱ्या विठ्ठल कारखान्याने काळे गटाच्या इच्छुक उमेदवाराचे दाखले अडवले मात्र कल्याणराव काळे सोडून बाकीच्या इतर उमेदवारांचे दाखले देण्यात आले आहेत. दस्तुरखुद्द गटाचे सेनापती कल्याणराव काळे यांचाच दाखला आजही अडवल्याने विठ्ठल कारखान्यावर काळे समर्थकांनी गोंधळ घातला.

दाखले अडवा आडवी संदर्भात सहकार शिरोमणी चे कार्यकारी संचालक श्री आसबे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही

## तरूणाने केला ११ वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुका परिसरात मंगळवारी सायंकाळी ७ वाजता एका ११ वर्षीय मुलास थंड पेय पाजून २५ वर्षीय तरुणाने बळजबरीने अनैसर्गिक अत्याचार केल्याची माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली.

आरोपी दिलीप गावडे (वय २५ रा. वागदरी) याच्यावर बाल लैंगिक अत्याचार कलमा प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून आरोपीला अटक करण्यात आली. याबाबत उत्तर पोलीस स्टेशन मध्ये बुधवारी गुन्हा दाखल झाला आहे. पीडित मुलाच्या आईने फिर्याद दिली. अक्कलकोट तालुका परिसरात बुधवार दि.१६ मे रोजी सायंकाळी ७ वाजता मैदानाजवळ पीडित ११ वर्षाचा मुलगा लग्नाची वरात पाहण्याकरिता गेला होता. त्या ठिकाणी आरोपी दिलीप गावडे (रा. वागदरी ता. अक्कलकोट) हा पिडीत मुला जवळ जाऊन बोलावून घेतले. थंड पेय पाजण्यास नेऊन त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. पीडित बालक हा जखमी असून त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. आरोपी विरुद्ध भादवी कलम ३७७, बाललैंगिक अत्याचार अधिनियम ४, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.त्याला गुरूवारी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. पुढील तपास फौजदार अजित मोरे हे करीत आहेत.

## शांतीनगरात तरुणाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

एका अठरा वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मजरेवाडी परिसरातील शांतीनगर येथे बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. नागेश कल्याणी वसेकरी (वय १८ रा. प्लॉट नंबर ७६ शांतीनगर मजरेवाडी) असे मयताचे नाव आहे.

त्याचा मृतदेह घरातील छताच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत नागेश वसेकरी याच्या पश्चात आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे. तो मजुरीचे काम करीत होता. बुधवारी सुट्टी असल्याने तो घरात होता. त्याचे आई-वडील बचत गटाचे पैसे भरण्यासाठी गेले होते. तर लहान भावास त्याने शाळा कधी चालू होणार ते बघून ये म्हणून पाठवून दिले होते. त्यानंतर त्याने हा प्रकार केला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कटके तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




अशी सुट्टी नको रे बाबा!

कल्याण
389-00-145

मेन बाजार
126-93-148

## कर्नाटकात १०० तास उलटूनही ’राजकीय नौटंकी’ सुरूच, कॉँग्रेसचा मुख्यमंत्री ठरेना!

सुराज्य/बेंगलोर

कर्नाटकच्या जनतेने कॉंग्रेसला सरकार स्थापन करण्यासाठी आणि बहुमताचा आकडा गाठून दिला. कर्नाटकमध्येकॉंग्रेसला तब्बल १३५ जागांवर विजय मिळाला. कर्नाटकातील धडाकेबाज विजयाला १०० तास उलटूनही मुख्यमंत्रीपदाचा पेच कायम आहे. मुख्यमंत्री कोणाला करायचे, सिध्दरामय्या की डीके शिवकुमार? हे अजून ठरलेले नाही. दिल्लीत बैठकांच्या वेगवान फेऱ्या सुरू आहेत. सिध्दरामय्या आणि डीके शिवकुमार यांनी राहुल गांधी यांचीही भेट घेतली आहे. पण पेच सुटताना दिसत नाही.

कॉंग्रेस नेत्यांची स्मितहास्य असणारी अनेक फोटो प्रसिध्द करण्यात आली आहेत. दोघांनी सोनिया गांधींशी फोनवर चर्चा केली. यानंतर बंगळुरूमध्ये सेलिब्रेशनला सुरुवात झाली. सिध्दरामय्या यांचे नाव निश्चित झाले असून शिवकुमार उपमुख्यमंत्री होणार असल्याची बातमी हळूच कुठूनतरी पसरली.



सिध्दरामय्या यांच्या समर्थकांनीही जल्लोष केला, मिठाई वाटली. पण नंतर कॉंग्रेसचे सुरजेवाला म्हणाले- अद्याप निर्णय झालेला नाही त्यामुळे समर्थक पुन्हा शांत झाले. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या बंगल्यातून बाहेर आल्यानंतर पक्षाचे नेते रणदीप सुरजेवाला म्हणाले की, सर्व अफवा आहेत. अद्याप कोणाचेही नाव निश्चित झालेले नाही. एक-दोन दिवसांत निर्णय होताच पक्ष स्वत: त्याची घोषणा करेल. भाजपला कॉंग्रेसच्या मुख्यमंत्री निवडीमध्ये रस असून अफवा पसरवण्याचा प्रकार सुरू आहे असा आरोपही कॉंग्रेसने केला आहे. कॉंग्रेसचे माजी नेते सुधाकर के म्हणाले की, त्यांनी सिध्दरामय्या यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी या सरकारशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगितले. तर डीके शिवकुमार यांनी राहुल गांधी यांची भेट घेतली असता त्यांना उपमुख्यमंत्री पदासह ५ ते ७ खात्यांच्या मंत्रिपदाची ऑफर देण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

### कर्नाटकची टाइमलाइन

▸ १३ मे : या दिवशी निकाल आले आणि कॉंग्रेसने बंपर विजय मिळवत १३५ जागांवर पूर्ण बहुमत मिळवले. ▸ १४ मे: कॉंग्रेस विधिमंडळ पक्षाची बंगळुरू येथे बैठक झाली, ज्यामध्ये मुख्यमंत्री कोण होणार हे खर्गे ठरवतील असा एक ओळीचा ठराव मंजूर करण्यात आला. ▸ १५ मे : निरीक्षकांनी दिल्ली गाठून अहवाल खर्गे यांच्याकडे सोपवला. सिद्धरामय्या दिल्लीला पोहोचले पण शिवकुमार आले नाहीत. ▸ १६ मे : खर्गे यांच्या घरी राहुल गांधी यांची भेट. डीके शिवकुमार यांनी दिल्लीत येऊन खर्गे यांची भेट घेतली. यानंतर सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांची खर्गे यांच्यासोबत बैठक झाली. ▸ १७ मे : पाचव्या दिवशीही बैठकांचा सिलसिला सुरूच होता. सोनिया गांधी यांच्या घरी कर्नाटकच्या सीएमवर चर्चा झाली. सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांनी राहुल गांधी यांची भेट घेतली मात्र मुख्यमंत्रीपदाचा निर्णय झाला नाही.

### डीके शिवकुमार यांची ताकद

कर्नाटक कॉंग्रेसचे अध्यक्ष असल्याने संघटनेवर त्यांची हुकूमत आहे आणि ते पक्षाचा विश्वासार्ह चेहरा आहेत. बलाढ्य वोक्कलिगा समुदायाशी संबंधित आहे. १९८९ पासून निवडणूक न हरण्याचा विक्रम. २००२ मध्ये महाराष्ट्रातील देशमुख सरकारला वाचवले. २०१७ मध्ये अहमद पटेल यांचा राज्यसभा विजय निश्चित झाला. ते सर्वात श्रीमंत आमदार आहेत. संपत्ती १२१४ कोटी रुपये आहे.

### सिद्धरामय्या यांची पॉवर

सिद्धरामय्या सोशल इंजिनीअरिंगमध्ये अधिक पॉवरफुल आहेत. सिद्धरामय्या यांच्या नाराजीमुळे कॉंग्रेसचे नुकसान होणार हे नक्की. ते कुरुबा समाजातील आहे. मुस्लिम मतदारांमध्येही त्यांची चांगली पकड आहे. सिद्धरामय्या यांची ही शेवटची निवडणूक होती. डीकेंच्या तुलनेत त्यांची प्रतिमा स्वच्छ आहे. त्यांना डीके यांच्यापेक्षा जास्त राजकीय अनुभव आहे. यशस्वी प्रशासकाचा ट्रॅक रेकॉर्ड आहे. सिद्धरामय्या यांचे जनसंपर्क आहे. त्यांनी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत.

CMYK

# सभापतींची कसोटी

उद्धव ठाकरे-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातर्फे एकमेकांविरोधात आमदार अपात्रतेच्या याचिका विधानसभा अध्यक्षांकडे सादर झाल्या असून त्यावर सुनावणी सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर अध्यक्षांचे राज्यघटनेतील दहाव्या परिशिष्टात संसद किंवा विधिमंडळ सदस्यांनी पक्षांतर केल्यास अपात्रतेची तरतूद करण्यात आली आहे. राजकिय पक्षांमधील आयाराम-गयाराम संस्कृतीला पायबंद घालण्यासाठी १९८५ मध्ये ५२ व्या घटनादुरुस्तीद्वारे पक्षांतरबंदी कायद्याची तरतूद करण्यात आली. राजकिय पक्षातील एक तृतीयांशहून अधिक आमदार किंवा खासदारांनी पक्षांतर केले, तर त्यांना अपात्रता लागू होऊ शकणार नाही. पण त्याहून कमी सदस्यांनी केले, तर त्या सदस्यांना अपात्र ठरविण्याची तरतूद करण्यात आली. पुढे ही मर्यादा एक तृतीयांशवरून दोन तृतीयांश सदस्यांपर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने या तरतुदी अधिक कठोर करण्यासाठी २००३ मध्ये ९१ व्या घटनादुरुस्ती केली. दोन तृतीयांशहून अधिक सदस्यांनी पक्षांतर केले, तरी त्यांनी दुसऱ्या राजकिय पक्षात विलीनीकरण होणे बंधनकारक करण्यात आले. अन्यथा अपात्रतेची कारवाई होऊ शकते. विधिमंडळ किंवा संसद सदस्याला अपात्र ठरविण्याचे अधिकार राज्यघटनेने पीठासीन अधिकाऱ्यांना दिले आहेत. एखाद्या लोकप्रतिनिधीने पक्षांतर केले, तर संबंधित राजकिय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून पीठासीन अधिकाऱ्यांकडे अपात्रतेच्या याचिका सादर केल्या जातात. त्यावर पुरावा कायद्यातील तरतुदींनुसार सुनावणी होते. उभय पक्षांना बाजू मांडण्याची संधी दिली जाते आणि युक्तिवाद व कायदेशीर मुद्द्यांचा विचार करून पीठासीन अधिकाऱ्यांकडून अपात्रतेबाबत निर्णय दिला जातो. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्याकडे शिंदे-ठाकरे गटातील आमदारांनी एकमेकांविरोधात आदित्य ठाकरे वगळता ५४ आमदारांना अपात्र ठरविण्याबाबत याचिका सादर केल्या आहेत. त्यावर आता उत्तर सादर करण्यासाठी आमदारांना



अध्यक्षांनी नोटिसा बजावण्यास सुरुवात केली असून आपले म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसांची मुदत दिली आहे. विधानसभा अध्यक्षांना राज्यघटना, पक्षांतरबंदी कायदा, नियमावली आणि सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने नुकतेच दिलेले निर्देश या आधारावर सुनावणी घेऊन निर्णय द्यावा लागणार आहे. शिंदे गटाला मूळ शिवसेना पक्ष म्हणून केंद्रीय निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. अध्यक्षांनी केवळ विधिमंडळातील संख्याबळाचा विचार न करता पक्षीय पातळीवरील बलाबलही जोखण्याचे न्यायालयाचे आदेश आहेत. आयोगापुढे शिंदे-ठाकरे गटाने लाखो कागदपत्रे सादर केली आहेत. अध्यक्षांपुढेही एवढ्या मोठ्या प्रमाणावर कागदपत्रे सादर केली गेली, तर त्याची छाननी करण्यात खूपच कालावधी जाऊ शकतो. १७ जुलैपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत असून त्याआधी मूळ शिवसेना कोणाची आणि कोणाचा प्रतोद अधिकृत आहे, याबाबत निर्णय द्यावा लागणार आहे. यादरम्यानच अपात्रतेच्या याचिकांवर सुनावणी होण्याची अपेक्षा आहे. विलासराव देशमुख यांच्या सरकारच्या कार्यकाळात तत्कालीन विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी १३ जून २००२ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव नाईक, नरसिंह पाटील, नारायण पवार, शिरीष कोतवाल, विनय कोरे, जनता दलाचे गंगाराम ठक्करवाड आणि राज्यपाल नियुक्त डेरमंड येट्स या सात आमदारांना अपात्र ठरविले होते आणि सरकार तरले होते. राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील तरतुदींनुसार अध्यक्ष किंवा पीठासीन अधिकाऱ्यांना आमदारांच्या अपात्रतेविषयीच्या याचिकांवर निर्णय देण्याचे पूर्ण अधिकार आहेत. मात्र ते वापरताना नियमावलीतील तरतुदींचा भंग असल्यास त्या मुद्द्यांवर न्यायालयीन छाननी होऊ शकते, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने १९९३ मध्ये किहोतो होलोहॉन प्रकरणी दिला आहे. अध्यक्षांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही, अशी तरतूद आधी दहाव्या परिशिष्टात करण्यात आली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ती घटनाबाह्य ठरवून रद्द केली आणि त्यापुढेही काही प्रकरणात अध्यक्षांच्या निर्णयात हस्तक्षेपही केले. ही सारी पार्श्वभूमी पाहाता सभापती राहुल नार्वेकर यांची कसोटीच ठरणार आहे.


राजकीय

# देवेगौडांच्या सौदेबाजीला विराम

**कर्नाटक विधानसभेच्या निकालानंतर माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांची राज्याच्या राजकारणातील गेली दोन दशके बजावली जाणारी 'किंगमेकर'ची भूमिका संपुष्टात आली आहे. कर्नाटक विधानसभेच्या यंदाच्या निवडणुकीत जनता दल सेक्युलर पक्षाची मतांची टक्केवारी व विजयी उमेदवारांची संख्या कमालीची घसरली. देवेगौडा यांच्या पक्षाच्या परंपरागत मतांमध्ये काँग्रेस व भाजप या पक्षात विभाजन झाल्याचे स्पष्ट झाले. जनता दल सेक्युलरची व्होट बँक २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत दुभंगली असल्याचे निकालानंतर उघड झाले. माजी पंतप्रधान देवेगौडा यांनी सन १९९९ मध्ये स्थापन केलेल्या जनता दल सेक्युलर पक्षावर आता अस्तित्वासाठी धडपड करावी लागत आहे. जनता दल सेक्युलर हा कधीही स्वबळावर सत्तेवर आलेला नाही. कधी काँग्रेस तर कधी भारतीय जनता पक्षांची खांद्यावर पालखी घेऊन हा पक्ष सत्तेच्या परिघात फिरत राहिला.**

यंदा २०२३ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोणालाच बहुमत मिळणार नाही, अधांतरी विधानसभा येईल, असे अनेक राजकिय विश्लेषकांनी व वेगवेगळ्या संस्थांनी केलेल्या मतदानापूर्वी व मतदानानंतरच्या पाहणीत अंदाज व्यक्त केले होते. प्रत्यक्षात २२४ जागांच्या विधानसभेत काँग्रेसने १३६ जागा जिंकल्या व स्वबळावर स्पष्ट बहुमत प्राप्त केले. त्यामुळे काँग्रेसला बहुमतासाठी किंवा सरकार स्थापनेसाठी कुणा दुसऱ्याच्या पाठिंब्याची आवश्यकता भासणार नाही. जनता दल सेक्युलरचे पस्तीस-चाळीस आमदार निवडून आले असते तर देवेगौडा पिता-पुत्रांना सत्तेत वाटा मिळण्याची व सत्तेसाठी सौदेबाजी करण्याची संधी मिळाली असती, पण जेमतेम १९ आमदार निवडून आणताना या पक्षाची दमछाक झाली. ज्या पक्षाचे सर्वाधिक आमदार निवडून येतील त्या पक्षाला साथ देण्याचे काम जनता दल सेक्युलरने एकदा नव्हे दोन वेळा केले. सन २००६ मध्ये आणि २०१८ मध्ये एकदा भाजप व दुसऱ्या वेळी काँग्रेसला साथ देऊन विधानसभेमध्ये सत्ताधारी पक्ष म्हणून जनता दल सेक्युलरने मलई खाल्ली आहे. जनता दलाशी फारकत घेऊन जनता दल सेक्युलर पक्ष स्थापन करणाऱ्या देवेगौडांनी कर्नाटकात अनेकदा किंगमेकरची भूमिका बजावण्याचा आजवर प्रयत्न केला आहे. सन २००४ मध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपने ७९ जागा जिंकल्या. काँग्रेसने ६५ जागा जिंकल्या आणि जनता दल सेक्युलरचे ५८ जागांवर उमेदवार विजयी झाले. तेव्हा जनता दल सेक्युलरने काँग्रेसला पाठिंबा दिला व काँग्रेसचे धरमसिंग मुख्यमंत्री झाले.

सन २००६ मध्ये जनता दल सेक्युलरने काँग्रेसला दिलेला पाठिंबा काढून घेतल्याने धरमसिंग सरकार कोसळले. भाजपचा पाठिंबा घेऊन जनता दल सेक्युलरचे नेते व देवेगौडा पुत्र कुमारस्वामी हे मुख्यमंत्री झाले व भाजपचे बी. एस. येडियुरप्पा हे उपमुख्यमंत्री झाले. सन २००८च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे १०८ आमदार निवडून आले. पण २२४ जागांच्या विधानसभेत बहुमतासाठी २१३ आमदारांची जादुई संख्या आवश्यक होती. भाजपने सहा अपक्ष आमदारांचा पाठिंबा घेऊन सरकार स्थापन केले. त्या निवडणुकीत काँग्रेसचे ८०, तर जनता दल सेक्युलरचे २८ आमदार विजयी झाले होते. सन २०१३च्या निवडणुकीत काँग्रेसचे १२२ आमदार निवडून आले. काँग्रेसने बहुमताचा आकडा प्राप्त केला होता. सिद्धरामैया यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. त्यावेळी जनता दल सेक्युलरचे ४० आमदार निवडून आले होते, पण त्यांच्या पाठिंब्याची काँग्रेसला गरज भासली नाही. सन २०१८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे १०४ आमदार निवडून आले. काँग्रेसचे ८० व जनता दल सेक्युलरचे ३७ आमदार विजयी झाले होते. सर्वात जास्त आमदारांचा पक्ष म्हणून भाजपने सरकार स्थापनेचा दावा केला व येडियुरप्पांनी मुख्यमंत्रिपदाची शपथही घेतली. सर्वोच्च न्यायालयाने येडियुरप्पांना बहुमत सिद्ध करण्याचे आदेश दिल्यामुळे अवघ्या ७२ तासांतच त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला व कर्नाटकच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले. काँग्रेसने जनता दल सेक्युलरबरोबर बंगळुरुमध्ये सरकार स्थापन केले आणि संधीचा लाभ उठवत देवेगौडा यांनी किंगमेकरची पुन्हा एकदा भूमिका बजावली. एच. डी. कुमारस्वामी हे मुख्यमंत्री झाले तरी पहिल्या दिवसापासूनच त्यांचे सरकार अस्थिर होते. सत्ताधारी आघाडीचे सतरा आमदार फुटले व थेट भाजपला जाऊन मिळाले. त्यांच्याबरोबर दोन अपक्ष आमदारांनीही भाजपच्या तंबूत प्रवेश केला. काँग्रेस-जनता दल सेक्युलर आघाडी सरकार अवघ्या १४ महिन्यात कोसळले. भाजपचे ऑपरेशन लोटस यशस्वी झाले. भाजपचे सरकार पुन्हा स्थापन झाले आणि येडियुरप्पांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सन २०२३ च्या निवडणूक निकालानंतर जनता दल सेक्युलरची काँग्रेस किंवा भाजपने साधी दखलही घेतली नाही. दोन्ही पक्षांना त्या पक्षाची गरज वाटली नाही. किंगमेकर म्हणून जनता दल सेक्युलरचे अस्तित्वच राहिले नाही. जनता दल सेक्युलरची मते मोठ्या संख्येने काँग्रेसकडे आकर्षित झाली. एकोणीस आमदार निवडून येऊनही जनता दल सेक्युलरची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशी झाली. जनता दल सेक्युलरचा दक्षिण कर्नाटकमध्ये जुन्या म्हैसूर प्रांतात चांगला प्रभाव होता. त्या प्रदेशात काँग्रेस व भाजप हे दोन्ही पक्ष कमकुवत होते. जनता दल सेक्युलरची ताकद यंदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आपल्याकडे खेचून घेतल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले. गेल्या दोन्ही निवडणुकीत दक्षिण कर्नाटकमधील निम्म्या जागा जनता दल सेक्युलरने जिंकल्या होत्या. पण यावेळी या प्रदेशातील मतदारांनी काँग्रेसवर अधिक विश्वास दाखवला. जुन्या म्हैसूर प्रांतात मुस्लीम, ख्रिश्चन आणि वोकलिंगा ही देवेगौडांची पारंपरिक व्होट बँक त्यांना सोडून काँग्रेसकडे गेली. गेली दोन दशके राज्यातील प्रत्येक निवडणुकीनंतर सत्ता स्थापनेसाठी जनता दल सेक्युलरची काँग्रेस किंवा भाजपला मदत घ्यावी लागत होती, आता मात्र काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाल्याने देवेगौडांचे सौदेबाजीचे राजकारण संपुष्टात आले. देवेगौडांनी स्थापन केलेल्या जनता दल सेक्युलर पक्षाने कर्नाटकमध्ये १९९९मध्ये पहिल्यांदा निवडणूक लढवली. त्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचे १० आमदार निवडून आले होते. २००४ मध्ये ५८, २००८ मध्ये २८, २०१३ मध्ये ४०, २०१८ मध्ये ३७ आणि २०२३ मध्ये १९ आमदार निवडून आले.



भारतीय जनता पक्षाचे १९९९ मध्ये ४४, २००२- ७९, २००८- ११०, २०१३- ४०, २०१८- १०४ आणि २०२३ मध्ये ६५ आमदार निवडून आले. काँग्रेस पक्षाचे १९९९ मध्ये १३२, २००४ - ६५, २००८ - ८०, २०१३- १२२, २०१८- ८० आणि २०२३ मध्ये १३६ आमदार निवडून आले. कर्नाटक विधानसभेसाठी १० मे रोजी मतदान झाले. माजी मुख्यमंत्री कुमारस्वामी मतदान करून बाहेर आल्यावर टीव्हीचे कॅमेरे दिसताच हात उंचावून दोन बोटे दाखवत आपलाच पक्ष यावेळीही किंगमेकर ठरणार, असे सूतोवाच केले. निवडणुकीपूर्वी कुमारस्वामी यांनी आपली व्होट बँक मजबूत राखण्यासाठी जुन्या म्हैसूर प्रांतात प्रचारयात्रा काढली होती. यात्रेत त्यांनी आपण सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांसाठी काय काय योजना राबवू, त्याची जंत्री मांडली होती. पण दिलेल्या आश्वासनांवर पक्षाचे पारंपरिक मतदार भुलले नाहीत. जिथे कोणत्याच पक्षाला बहुमत मिळत नाही, तेथे किंगमेकरची भूमिका महत्त्वाची असते. कर्नाटकात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाल्याने देवेगौडा यांच्या पक्षाची वाटचाल अंधाराकडे चालली आहे. दरवेळी तिसऱ्या क्रमांकावर निवडून येऊनही सत्तेच्या परिघात वावरणाऱ्या जनता दल सेक्युलरला आता आपल्या अस्तित्वासाठीच हात-पाय मारावे लागणार आहेत. विशेष म्हणजे, देवगौडांचा नातू निखिलचा लोकसभा निवडणुकीतही पराभव झाला आणि आता विधानसभा निवडणुकीतही पराभव झाला. स्वत: एच. डी. देवेगौडा ८९ वर्षांचे आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत ते प्रचारासाठी सक्रिय असण्याची शक्यता कमीच आहे. देशाच्या माजी पंतप्रधानांवर त्यांनी स्वत: स्थापन केलेल्या पक्षासह घरी बसण्याची वेळ आली आहे. देवेगौडा पिता-पुत्रांच्या सौदेबाजीच्या राजकारणाला २०२३ च्या निकालाने विराम मिळाला आहे.

**- सुकृत खांडेकर.**


टुडेज् ब्लॉग

# अपेक्षित जीवन जगण्यासाठी

काळ जसा बदलत चाललाय तसतसं जग जवळ येत चाललंय आणि सर्वच क्षेत्रात प्रचंड उलथापालथ सुरू आहे. माणसाची जीवनशैली तर पूर्ण बदलली आहे. कार्यसंस्कृती बदलत आहे. सुखसोई वाढताहेत पण त्याचबरोबर स्पर्धा, अस्थिरता, ताणतणाव वाढत आहेत. माणूस जगण्याच्या शर्यतीत यशस्वी होण्यासाठी मनाप्रमाणे धावत आहे. माणसाचं यश हे त्याच्याच हातात असते हे खरे आहे. विचार, कल्पना, भावना, सवयी, प्रतिक्रिया, संकल्पना अशा सर्व अंगी आपण मनाला व जीवनाला भिडून मनसोक्त आणि मनाजोगतं, मस्त, मजेत जगता आले पाहिजे. कसंही, कोणत्याही पद्धतीने जगण्याची केवळ थेअरी असू शकत नाही. प्रत्यक्ष जगणं म्हणजे प्रॅक्टिकल जगणं हे खरे महत्त्वाचं म्हणून जीवनात असामान्य कार्य करण्यासाठी व आनंदाने, मजेत जगण्यासाठी स्वतःशीच फोर ॲग्रिमेंटस करा.

आपल्या शब्दांशी प्रामाणिक रहा हे पहिले ॲग्रिमेंट. हा जितका अत्यावश्यक आहे तितकाच पाळायला कठीणही आहे. शब्दच का? कारण शब्दात प्रचंड ताकद आहे. शब्दांद्वारेच सर्जनशीलता प्रदर्शित करता आणि सर्व गोष्टी वास्तवात येतात. जे काही निर्माण करता येते ते शब्दांद्वारेच. खरोखर शब्द एक दुधारी शस्त्र आहे. शब्दांनी मने जोडता येतात, त्याचप्रमाणे कटू शब्दामुळे माणसाचे मने तुटतात. एखादा कठोर शब्द दुसऱ्याचे मन दुखवून जातो. तेथे कायमची जखम करतो. म्हणून बोलताना विचार करावा.

कोणतीही गोष्ट मनाला लावून घेऊ नका हे दुसरे ॲग्रिमेंट. मनुष्यप्राणी हा एक सोशल प्राणी आहे. कुटुंबात, मित्रमंडळीत किंवा शेजाऱ्यांमध्ये



रमणारा प्राणी. भवताली माणसं हवींच. मुद्दा असा आहे, आपण उठल्यापासून ते झोपेपर्यंत अनेक माणसांशी संबंध येतो. झालेल्या प्रसंगाला समोरच्या नजरेतून पहा. आपल्याच माणसांना आरे ला कारे करणे गरजेचे आहे का हा विचार करा. आणि सर्वात महत्त्वाचे स्वतः ची किंमत स्वतः ठेवा.


धारणा बनवायची सवय सोडा हे तिसरे ग्रिमेंट. बऱ्याचदा आपण समोरच्या व्यक्तिंबद्दल चुकीचे गैरसमज करून घेत असतो आणि समोर दिसणाऱ्या चित्रावरून त्या व्यक्तिंबद्दल अंदाज बांधत असतो. कित्येक वेळेला आपल्याला एखादी गोष्ट कळत नसली की आपण एक धारणा बनवतो. अशा या धारणेच्या समस्येवर एकच उपाय म्हणजे समोरच्या व्यक्तिंबरोबर बोलणे, चर्चा करणे.

नेहमी सर्वोत्तम, चांगले कार्य करा हे चौथे ॲग्रिमेंट. ज्याप्रमाणे एखाद्या भिंगावर जेव्हा सूर्याची किरण एकत्रित होतात तेव्हा त्याची ताकद एवढी असते की त्यातून उष्णता आणि आग तयार होते त्याचप्रमाणे तुमची क्षमता आणि बुद्धिमत्ता काही महत्त्वाच्या गोष्टींवर केंद्रित केली तर तुम्ही सर्वसामान्य माणसापेक्षा कितीतरी पटीने मोठं सर्वोत्तम कार्य करू शकाल तेही अतिशय कमी कालावधीमध्ये. आपल्या कल्पनांना वास्तवात असायचे असेल तर कृती महत्वाची. योग्य कृती योग्य वेळेला करा म्हणजे आपोआप सर्वोत्तम कार्य घडेल. तुम्हाला अपेक्षित असलेलं सुंदर, भाग्यशाली, सुखद आणि समृध्द जीवन जगण्यासाठी तुम्हाला जे काही लागतं ते सर्व तुमच्या आतच दडलंय. या खजिन्याचा वापर करून वरील चार ॲग्रिमेंट स्वतःशीच करून एक यशस्वी अपेक्षित जीवन जगू शकता.

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**

जन्म हा अखेरचा

# इंद्रियानुग्रहस्थल - १



इंद्रिये विषयग्रहण करतात, म्हणून त्यांना 'ग्रह' अशी संज्ञा आहे. परंतु विषय मात्र 'अतिग्रह' आहेत. कारण विषयसेवन करुन करुन इंद्रिये थकतात, परंतु विषय मात्र सरत नाहीत. आजपर्यंत असंख्य लोकांनी आपल्या इंद्रियांच्या द्वारे विषयांचे सेवन केले ती माणसे थकली आणि मेली, परंतु विषय मात्र आहेत तसेच राहिले. इंद्रिये विषयसेवन करुन थकतात, परंतु मन मात्र अतृप्त राहिलेले असते, तुम्ही वृद्ध व्हाल, परंतु तुमचे मन मात्र कधीच वृद्ध होणार नाही. मन कधीच भरत नाही. आधी ते पोटभर जेवण मागेल, पोट भरल्यावर दुसरे काहीतरी मागत राहील. मन मागेल ते देण्याचा मनुष्य आयुष्यभर प्रयत्न करतो तरीदेखील मृत्यूच्या क्षणी मन अतृप्तच असते. फार कमी माणसे तृप्त मनाने हे जग सोडतात. हसत हसत मृत्यूला सामोरे जाणारे किती लोक असतात? रडणारेच अधिक असतात. जो रडत रडत मरण पावतो तो दुसरा जन्म घेताना रडतच या जगात येतो. जन्मानंतर हसणारे मूल कोणी पाहिले आहे काय? या जन्मातील अंतिम स्थिती जशी असेल तशीच दुसऱ्या जन्मातील प्रारंभीची स्थिती असते. रडत जातो तो रडतच येतो. जन्माची सुरुवात रडण्याने होते आणि पुढे आयुष्यभर नशिबी रडणेच येते. जीवनाचा उपक्रम रडणे आणि उपसंहार देखील रडणेच. आदी, मध्य आणि अंत असा रुदनमय असल्यामुळे पुढचा जन्मदेखील मागील पानावरुन पुढील पानावर ओढल्याप्रमाणे रुदनमय ठरतो. प्रपंच असा सर्वांना रडवतो. प्रपंचातील सारेजण रडतात. एखादाच हसणारा असतो. सगळेच रडणारे असतात तेव्हा एखादा हसणारा आणि हसवणारा पाहिजे असतो. हसणे ही आनंदाची अभिव्यक्ती असते तर रडणे हा दु:खाचा अविष्कार असतो. ज्याचा चेहरा विषादाने काळवंडलेला असतो, त्याच्या मनात दु:ख साचून राहिलेले असते. ज्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता ओसंडत असते, त्याच्या हृदयात आनंद भरुन राहिलेला असतो. दु:खमय प्रपंचात मन सुखाचा शोध घेत असते. प्रपंच म्हणजे दु:खाचा बाजार. कोणत्याही दुकानात जा, तेथे दु:खच मिळेल, सुख नव्हे. त्या दु:खावर सुखाचे झिरझिरीत आवरण असते. या बाजारात सर्वजण मागणारेच आहेत, देणारे कोणी नाहीत.

**'नहि भिक्षुक: भिक्षुकं याचते ।'** एक भिकारी दुसऱ्या भिकाऱ्याकडे भीक मागू शकत नाही. मागितली तर तो म्हणेल, 'मीही भिकारीच आहे, मला का मागतोस?'

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# पालकांनो...सुट्टीत मुलांना वेळ द्या

समस्त शाळकरी मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून आता उन्हाळी सुट्टी पडली आहे. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळत असे. आता मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये त्यांची पुरती दमछाक होत आहे. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र काही पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही. अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवस-दिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात. मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन् होतो. इंटरनेट विश्वात



अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात. याखेरीज मुलांच्या कोवळ्या डोळ्यांवर या मोबाईल्स आणि टीव्हीच्या किरणांचा परिणाम होऊन त्यांची दृष्टीक्षमता अल्प होते. यासाठी मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना विविध संस्कार, क्रीडा आणि शौर्य शिबिरांना पाठवा. त्यांच्यासाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक पाठांतर करून घ्या. देवतांचे अवतार, क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगा. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या!

**- जगन घाणेकर, मुंबई.**

# वस्तुसंग्रहालये...

## कलेची जोपासना करणारी ठिकाणे

### जागतिक वस्तुसंग्रहालय दिन

संग्रह करण्याची वृत्ती मानवाला अगदी पूर्वीपासून आहे. आजही अनेकांच्या जवळ पूर्वीचे अनेक ग्रंथ, वस्तू जपून ठेवलेल्या असतात. आपल्या पूर्वजांच्या वस्तू मोठ्या अभिमानाने दाखविण्याची अनेकांना मोठी हौस असते. ग्रीस देशात अशी अनेक मंडळी अस्तित्वात होती की ज्यांना वस्तू व इतर अनेक गोष्टी जपून ठेवण्याची सवयच होती त्यातूनच वस्तुसंग्रहालये यांचा जन्म झाला. इसवी सन पूर्व २८० यावर्षी टोलेमीने इजिप्तमध्ये अलेक्झांड्रिया या शहरात पहिले संग्रहालय स्थापन केले. भारतात सुद्धा संग्रहालयाचा इतिहास खूप जुना आहे.

आज जगातील २०२ देशात जवळपास ५५००० हून अधिक संग्रहालये अस्तित्वात आहेत. जगातील सर्वात जास्त प्रेक्षक म्हणजेच ८१ लाख दरवर्षी पॅरिस येथील संग्रहालयाला भेट देतात. भारतात १७८७ मध्ये पहिले संग्रहालय कलकत्ता येथे एम्प्रियाल म्युझियम म्हणून उदयास आले. आज ते 'इंडियन म्युझियम' या नावाने ओळखले जाते. पहिले संग्रहालय डॉक्टर वालिस या डॅनिश शास्त्रज्ञांच्या प्रेरणेने झाले. त्यानंतर १८५० मध्ये मद्रासमध्ये एक संग्रहालय स्थापन झाले.

महाराष्ट्रात १८८३ मध्ये नागपूर येथे सेंट्रल म्युझियम नावाचे संग्रहालय स्थापन झाले. महाराष्ट्र राज्यातील हे सर्वात जुने संग्रहालय आहे. आजही या संग्रहालयात ४००० पेक्षा जास्त वस्तू आहेत. भारतात अनेक संस्थानिकांनी त्यांच्या संस्थानात संग्रहालयाची स्थापना केली. त्यात सातारा जिल्ह्यातील औंध येथील राजे भगवानराव पंत प्रतिनिधींनी स्थापना केलेले भवानी संग्रहालय तसेच सांगली येथे राजे पटवर्धन यांनी स्थापन केलेले संग्रहालय ही प्रसिद्ध आहेत. पुण्यामध्ये राजा केळकर संग्रहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील सिंबायसेस विद्यापीठाचे संग्रहालय, आदिवासी संशोधन केंद्र पुणे डेक्कन कॉलेज पुणे यांच्या अंतर्गत असणारे पुरातत्त्व व मराठा इतिहास संग्रहालय आगाखान पॅलेस संग्रहालय, पेशवे संग्रहालय



पर्वती महात्मा फुले संग्रहालय, लोकमान्य टिळक संग्रहालय, राष्ट्रीय लष्करी संग्रहालय ही प्रसिद्ध संग्रहालये आहेत. संग्रहालयात अनेक वस्तू, कला तसेच ऐतिहासिक परंपरा यांचे जतन केले जाते. संग्रहालये ही समाज शिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. प्रत्येक व्यक्तिच्या ज्ञानात भर टाकण्याचे काम ती करत असतात. संग्रहालयाचे विविध प्रकार आहेत. **इतिहासविषयक** : यामध्ये प्राचीन हत्यारे, प्राचीन कागदपत्रे, मानवी संस्कृती या विषयक साहित्य व वस्तू असतात. **उत्क्रांतीविषयक** : यामध्ये खडक, स्फटिक, पशू-पक्षी, जीवाश्म, पृथ्वीच्या उत्पत्तीपासून ते मानवाच्या उत्क्रांतीपर्यंत. **सजीव संग्रहालये** : यामध्ये वनस्पती, उद्याने, प्राणी, मत्स्यालय इत्यादी. **विशेष संग्रहालये** : यामध्ये रेल्वे, संरक्षण साहित्य, विज्ञान बाहुल्याचे विविध प्रकार इत्यादी. भारतात अनेक संग्रहालये आहेत. त्यामध्ये रिझर्व्ह बँकेचे मुंबई येथेही संग्रहालय, पंथी संग्रहालय नाशिक, मानव संग्रहालय भोपाळ मध्यवर्ती संग्रहालय नागपूर इ. हैद्राबाद येथील संग्रहालय इत्यादी संग्रहालये प्रसिद्ध आहेत. संग्रहालये ही जणू समाज शिक्षणाची ती केंद्रच असतात. एखादा छंद मनात धरून सुद्धा अनेक व्यक्तींनी खाजगी संग्रहालये स्थापन केली आहेत. संग्रहालये ही देशाची राष्ट्रीय संपत्ती आहे. तो अनेक अमूल्य ठेवा आहे. आज या संग्रहालय दिनाच्या निमित्ताने भारताच्या या ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेव्याचा अभ्यास करणे हे प्रत्येक भारतियांचे कर्तव्य ठरते.

**- शांताराम वाघ, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## दुचाकी चालकास मारहाण करून २० हजाराचा माल लुटला

**सोलापूर :** दुचाकी वरून घराकडे जाणाऱ्या तरुणास मारहाण करून त्याच्या खिशातील रोख रक्कम, मोबाईल असा २० हजाराचा माल लुटण्यात आला .ही घटना बार्शी बायपास रोडवरील कॅनॉलच्या पुलावर सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी तिघा अनोळखी इसमाविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे .

रवींद्र प्रभाकर अंधारे (वय २६ रा.भूम जि.धाराशिव) यांनी यासंदर्भात बार्शी शहर पोलीसात फिर्याद दाखल केली . ते आत्याचे मुलीचे लग्न आटोपून सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास पिंपळगाव रोडने माणकेश्वर येथे निघाले होते. बार्शी कॅनॉलच्या पुलावर दुचाकी थांबून ते लघुशंका करीत होते . त्यावेळी दुसऱ्या एका दुचाकीवरून ट्रिपल सीट आलेल्या तिघा इसमापैकी एकाने त्यांना पाठीमागून पकडून मारहाण केली . तर अन्य दोघांनी त्यांच्या खिशातील ३ हजार ८०० रुपये रोख, मोबाईल आणि हातातील घड्याळ असा माल लुटून त्यांच्या दुचाकीवरून पसार झाले .अशी नोंद पोलिसात झाली . पुढील तपास सहाय्यक फौजदार बरपे हे करीत आहेत .

## मोहोळ बस स्थानकात महिलेचे ७० हजारांचे दागिने पळविले

**सोलापूर :** बस मध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका महिलेच्या पर्समधील १७ ग्राम सोन्याचे दागिने पळविले. ही घटना मोहोळ बस स्थानकात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली .

यासंदर्भात गौरी संतोष अनुसे (वय १९ रा.कडलास ता.सांगोला) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली . त्या काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास आपली बहीण आणि त्यांच्या मुलासोबत सोलापूर ते कोल्हापूर बस मधून सांगोला येथे जाणार होत्या . बसमध्ये प्रवेश करताना चोट्याने त्यांच्या पर्समधील ७० हजाराचे दागिने पळविले . असे त्यांच्या तक्रारीत नमूद आहे . हवालदार माने पुढील तपास करीत आहेत .

## मारहाणप्रकरणी वडील, भाऊ आणि पुतण्याविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर :** शेतातील वाड्यात हिस्सा मागितल्याच्या कारणावरून तरुणाला कुऱ्हाड, काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून जखमी करण्यात आले ही घटना लाडोळे (ता.बार्शी ) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली . या प्रकरणात वैरागच्या पोलिसांनी जखमीचे वडील, सख्खा भाऊ आणि पुतण्यविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राजाभाऊ रामा उबाळे (वय ४९ रा. लाडोळे) असे जखमींचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे वडील रामा तात्या उबाळे, भाऊ बाळासाहेब उबाळे आणि पुतण्या राहुल बाळासाहेब उबाळे (सर्व रा.लाडोळे) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी राजाभाऊ उबाळे हे सोमवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास शेतातील पिकाला पाणी देत होते. त्यावेळी तिघांनी घटनास्थळी घेऊन त्यांना तु सारखे वाड्यातील हिस्सा का मागतो? तुला आम्ही वाडा देणार नाही. असे म्हणत वडिलांनी त्याला काठीने मारले . ते खाली कोसळल्यानंतर भाऊ बाळासाहेब याने कुऱ्हाडीने तर राहुल याने लाथाबुक्याने मारहाण करून गंभीर जखमी केले . अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार सोनकांबळे पुढील तपास करीत आहेत.

# आत्महत्या करतो म्हणून गायब झालेले माजी जि. प. सदस्य माळी अखेर सापडले

**सुराज्य/पंढरपूर**

**सोशल मीडियावर मी आत्महत्या करण्यास जात असून माझा शोध घेऊ नका अशा प्रकारची पोस्ट टाकून गेले दोन दिवस बेपत्ता असणारे भोसे जि प गटाचे माजी सदस्य बाळासाहेब माळी सातारा जिल्ह्यातील गोंदवले येथे करकंब पोलीसांना सापडल्याची माहिती करकंब पोलीस स्टेशन चे स पो नि निलेश तारू यांनी दिली.**



पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, भोसे जी प गटाचे माजी सदस्य बाळासाहेब माळी हे त्यांचे पेट्रोल पंपावरील मॅनेजर तानाजी कोळी याचे त्रासास कंटाळून आत्महत्या करण्यास जात असल्याची पोस्ट सोशल मीडियावर टाकून बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांची पत्नी सुरेखा माळी यांनी करकंब पोलीस स्टेशन येथे दिली होती.

त्यानंतर सोलापूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे व अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव व पंढरपूर चे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचे मार्गदर्शना खाली स पो नि निलेश तारू यांनी एक पथक तयार करून श्री माळी यांचे तपासासाठी पाठविले सदर पथकाने मोबाईल सी डी आर व गोपनीय बातमीदार यांचे सहकार्याने गतीने तपास करून सातारा जिल्हातील गोदवलेकर महाराज मठा समोर श्री माळी यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सपोनि निलेश तारू करीत आहेत.

## नीलम नगर येथे मोटारीच्या धडकेने पादचारी वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर :** मुलीला भेटण्यासाठी पायी जात असताना पाठीमागून मोटर धडकल्याने ७० वर्षीय वृद्ध गंभीर जखमी होऊन मरण पावले . हा अपघात नीलमनगर परिसरातील करली चौकात सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडला .

श्रीनिवास नरसप्पा करली (वय ७० रा . नवीन विडी घरकुल ) असे मयताचे नाव आहे . ते सोमवारी सायंकाळी एमआयडीसी येथे मुलीला भेटण्यासाठी पायी निघाले होते करली चौकातील रिक्षा स्टॉप जवळ पाठीमागून एमएच१३-एसी - २७३७ या क्रमांकाची मोटार धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते . त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते मंगळवारी सायंकाळी मयत झाले . या अपघाताची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे .

# युवा संशोधक अभियंता बऱ्हाणपुरे यांचा सोलापूर विद्यापीठाकडून सन्मान

## डजंट प्रोफेसर म्हणून बऱ्हाणपुरे यांना विद्यापीठाकडून ऑफर

**सुराज्य/सोलापूर**




येथील युवा संशोधक अभियंता राहुल बऱ्हाणपुरे यांनी वाहनांमधील ३० टक्के इंधन प्रदूषण कमी करणारा पार्ट विकसित केलेला असून सदरील पार्ट व त्याचे पेटंट टाटा मोटर्सकडून तब्बल साडे तेरा कोटी रुपयांस खरेदी करून सोलापूरचा मान उंचावला आहे, याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे अभियंता राहुल बऱ्हाणपुरे यांचा सन्मान करण्यात आला.

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते राहुल बऱ्हाणपुरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणीक शहा, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठता डॉ. लक्ष्मीकांत दामा, डॉ. विकास पाटील, डॉ. गौतम कांबळे, डॉ. सचिन लड्डा, डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. अंजना लावंड, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. राजेंद्र वडजे आदी उपस्थित होते.

यावेळी राहुल बऱ्हाणपुरे यांनी विकसित केलेला पार्ट व त्याच्या पेटंटबद्दल बोलताना म्हणाले की, एमसीवीसीचे शिक्षण घेतल्यानंतर वर्कशॉपमध्ये प्रत्यक्ष काम करताना ही कल्पना मनात आली व २०११ पासूनच कामाला लागलो. सध्याच्या वाहनांमध्ये 'इजीआर' सिस्टीमचा वापर केला जातो. या पार्टचे काम प्रभावी होण्यासाठी 'पीसीएम' या सेंसरद्वारे हा पार्ट नियंत्रित केला जातो. सायलेन्सरमधून बाहेर फेकली जाणारी ३० टक्के दूषित हवा या पार्टमुळे पुन्हा रिसायकल होऊन इंजिनमध्ये सोडले जाते.

त्यामुळे प्रदूषणात तेवढीच घट होणार असून दहा टक्के इंधनाची देखील बचत होते. नायट्रोजन, कार्बन डाय-ऑक्साइड, हायड्रोकार्बन असे घातक वायू वाहनांमधून उत्सर्जित होतात. त्यातील नायट्रोजन ऑक्साईड हा खूपच घातक मानला जातो. त्याचे प्रमाण कमी करण्यात हा पार्ट महत्त्वाचा असणार आहे. हा पार्ट बनवायला तेरा वर्षे लागले. त्यानंतर पेटंट पब्लिश झाल्यानंतर तीन कंपन्यांकडून मागणी आली.

यावेळी बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले की, अतिशय कठीण परिस्थितीतून युवा संशोधक अभियंता राहुल बऱ्हाणपुरे यांनी हा पार्ट विकसित करून संशोधनाची व्याप्ती व्यावसायिक पातळीवर नेऊन ती जागतिक स्तरावर पोहोचवली आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी त्यांनी विकसित केलेला हा तंत्रज्ञ निश्चितच शाश्वत विकासासाठी बळ देणारा आहे. विद्यार्थी दशेत त्यांनी केलेले हे संशोधन निश्चितच सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी रोल मॉडेल ठरणारे आहे.

## तेलुगूभाषा ग्रंथालयम्च्यावतीने तेलुगू लेखन वाचन कार्यक्रम

**सुराज्य/सोलापूर**

तेलुगूभाषा अभिवृद्धी ग्रंथालयम्च्यावतीने ज्येष्ठ कवी डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या जयंतीनिमित्ताने आयोजित केलेल्या तेलुगू भाषा लेखन, वाचन, निरोप समारंभ पार पडला. एक महिन्याचे कालावधींचे अशोक चौक ग्रंथालयाचे कार्यालयात सोलापूर आकाशवाणी केंद्राचे प्रमुख राजेंद्र दासरी यांच्या हस्ते तेलुगूतल्ली फोटोपूजन व दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बालराज बोल्ली यांनी भूषविले. कार्यक्रमाची प्रस्तावना मल्लिकार्जुन कमटम यांनी केले.

सूत्रसंचालन रेणुका बुधाराम व प्रभाकर भिमनाथ यांनी केले. आभार सचिव तिप्पण्णा गणेरी यांनी मानले. राजेंद्र दासरी यांच्या हस्ते विद्यार्थी विद्यार्थिनींना व ज्येष्ठ नागरिकांना प्रशस्तिपत्र व तेलुगू, मराठी, पुस्तक देऊन सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमास श्रीनिवास यनगंदूल, श्रीनिवास गाली, गोवर्धन कमटम, विजयालक्ष्मी गुडूर (ग्रंथपाल), अंबादास फलमारी, पुरुषोत्तम बुधाराम, ॲड. श्रीनिवास क्यातम, अशोक काळपगार, भावसान शहा, विजया गोरंटला, अनुराधा गंगूल, श्रीनिवास इंगळे, भारती इंगळे, मनोज सामल, नागेश कोडंगल, नरसय्या गुंटूक, महेश बोडा आदी उपस्थित होते.

## प्राचार्य डॉ. शेंडगे यांना काव्यगौरव पुरस्कार

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या 'वर्तुळाच्या आत बाहेर अस्वस्थ मी' या कवितासंग्रहास छ. संभाजीनगर येथील मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा मुक्त सृजन वालाई काव्यगौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे.



प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचे या यशाबाबत संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, सर्व विश्वस्त मंडळ, प्राध्यापक वर्ग आणि कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## लेबर पार्टीच्या प्रदेशाध्यक्षपदी अहमद

**सोलापूर :** महाराष्ट्र निवडणूक आयोगाची मान्यता असलेल्या लेबर पार्टी महाराष्ट्र प्रदेश या राज्यस्तरीय पक्षाची कार्यकारणीची बैठक नुकतीच सोलापूर येथील पक्ष कार्यालयात पार पडली. यावेळी साथी बशीर अहंमद यांची प्रदेशाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभागाचे अध्यक्ष प्रा. एम. ए. कोकलगावे होते.



२०१६ मध्ये असंघटित क्षेत्रात काम करणारे शेतकरी, शेतमजूर, यंत्रमाग, हातमाग, वेठबिगार, बांधकाम, विडी व घरेलू व इतर कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी लेबर पार्टी महाराष्ट्र प्रदेशाची स्थापना कामगार दिनी १ मे ला करण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगाने १९ सप्टेंबर २०१६ रोजी लेबर पार्टीला राज्यस्तरीय राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली आहे.

## आत्तापर्यंत शहरातील २ हजार मिळकतींचे सर्वेक्षण

**सुराज्य/सोलापूर**

महापालिका प्रशासनाकडून शहरातील मिळकतींचे सर्वंकष सर्वेक्षण सुरू आहे. या तीन दिवसात सुमारे २ हजार मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात आले आहे, अशी माहिती उपायुक्त विद्या पोळ यांनी दिली.

महापालिकेच्या वतीने मिळकत कर विभागाअंतर्गत सोलापूर शहरातील सर्व मिळकतींचे सर्वंकष सर्वेक्षण दि.१५ मे २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून या सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे.

संबंधित कर्मचाऱ्यांना यापूर्वीच दोनदा प्रशिक्षण देण्यात आले. मिळकतदारांच्या घरोघरी जाऊन गुगल फॉर्म भरून सर्व माहिती संकलित करण्यात येत आहे.

एकूण ११३ पथकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. प्रत्येक पथकास रोज साधारणता: ४० ते ५० मिळकतीं सर्वेक्षणाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या तीन दिवसात आतापर्यंत सुमारे २ हजार मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. मिळकतदारांचा यासाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले.

सोलापूर शहरात शहर व हद्दवाढ भागात सुमारे दोन लाख ५० हजार मिळकती आहेत. पेठनिहाय हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. शहरात एकूण ५० पेठ आहेत. सर्व पथकांकडून सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे.








## मनोरमा बँकेच्या वतीने कर्ज मेळावा उत्साहात

**सोलापूर :** मनोरमा बँकेच्या वतीने मनोरमा बँकेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये लघुउद्योग व नवीन व्यवसायाकरिता तसेच व्यवसाय वाढीसाठी कर्ज मेळावा मंगळवारी सायंकाळी उत्साहात पार पडला. विजापूर रोड शाखेच्या १४ व्या वर्धापनदिनानिमित्त हा मेळावा झाला.

अध्यक्षस्थानी मनोरमा बँकेचे चेअरमन श्री. श्रीकांत मोरे होते. यावेळी मनोरमा सखी मंच अध्यक्षा शोभा मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

चेअरमन श्रीकांत मोरे म्हणाले, अर्थकारणात ठेवीदारांचं हित आहे तसं कर्ज वाटपासाठी बँक कुठली कारवाई करते हे योग्य नाही. नाउमेद होऊ नका. जिद्द बाळगा. आपले यश हे कर्जवाटपामध्ये आहे. कर्मचाऱ्यांनी १० मुद्यावर काम केले पाहिजे. मार्केटिंग केले पाहिजे. परिवाराची वाटचाल ही तुमच्या आमच्या समाधानाची असते. यावेळी सर्व कर्जदारांना कर्जमंजुरी पत्र देण्यात आले. संचालक संतोष सुरवसे यांनी प्रास्ताविक केले. शाखाधिकारी अजय मोरे यांनी आभार मानले.

यावेळी बँकेचे संचालक संतोष सुरवसे, सुहास भोसले, मोहन गायकवाड, रंजनाताई सुरवसे, बँकेच्या सीईओ शिल्पा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## रेल्वे स्टेशन सल्लागार समितीवर भरत काकडा यांची निवड



**सोलापूर :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या रेल्वे स्टेशन सल्लागार समितीवर भरत काकडा यांची निवड करण्यात आली. भरत काकडा यांनी आजवर केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन मध्य रेल्वे सोलापूर विभागातर्फे ही निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, भाजपा व्यापार आघाडीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य श्रीनिवास दायमा, पापाशेठ दायमा यांनी अभिनंदन केले.

## तडीपार आरोपी नलवडे अटकेत

**सोलापूर :** तडीपार आदेशाचा भंग करून शहरात वावरत असतांना तडीपार आरोपीस ताब्यात घेऊन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओंकार उर्फ नायट्या संतोष नलवडे (वय-२०,रा.लक्ष्मी पेठ, गवळी वस्ती) असे त्या आरोपीचे नाव आहे. नलवडे यास पोलीस उपायुक्त यांनी ४ एप्रिल २०२२ रोजी पासून दोन वर्षाकरीता सोलापूर शहर व जिल्ह्यातून तडीपार केलेले होते.या तडीपार आदेशाचा अंमल चालू असताना त्याने पूर्व परवानगी शिवाय तडीपार आदेशाचा भंग करुन शहारातील मरीआई चौकात मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी विनोद व्हटकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी नलवडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मदन कुलकर्णी यांचे निधन



**मोहोळ :** मोहोळ येथील मोहोळ तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मदन गोविंद कुलकर्णी यांचे बुधवार दि.१७ मे रोजी सकाळी ६ वाजता मार्कंडेय रूग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते मृत्युसमयी ५६ वर्षांचे होते. विविध दैनिकात मोहोळ प्रतिनिधी म्हणून काम करत त्यांनी समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडली होती. मोहोळ येथील फळबाग घोटाळा राज्य भर गाजला होता मोहोळ येथील व्यापारी मोफत वाचनालयाचे ते सहव्यक ग्रंथपाल होते त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान भरती प्रक्रिया

# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या महापालिकेत होणार आज मुलाखती

सुराज्य/सोलापूर

**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत सोलापूर महापालिका आरोग्य विभागाकडून भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दरम्यान, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती महापालिकेत गुरूवार, १८ मे २०२३ रोजी होणार आहे. तर फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम पदासाठी गुणानुक्रमे प्राथमिक स्वरूपाची निवड यादी ३० मे रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यामध्ये गुणानुक्रमे अव्वल असलेल्या उमेदवारांची थेट नियुक्ती करण्यात येणार आहे.**



राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एनयूएचएम) अंतर्गत सोलापूर महापालिका आरोग्य विभाग प्रशासनाकडून शहरातील विविध आरोग्य केंद्रास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेकरीता ९ संवर्गातील ४९ पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते.

९ संवर्गातील ४९ पदांसाठी एकूण ७०६ अर्ज महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. वैद्यकीय अधिकारी युपीएचसी पूर्णवेळ या पदाच्या ४ जागांसाठी एकूण २२ अर्ज प्राप्त झाले आहेत. वैद्यकीय अधिकारी प्रसूतीगृह पूर्ण वेळ या पदाकरिता २ जागांसाठी ३ अर्ज आले आहेत. साथ रोग तज्ञ या खुला प्रवर्गासाठी १ जागा असून त्यासाठी ४ अर्ज प्राप्त झाले आहेत. जीएनएम या आर्थिक दुर्बल घटकाच्या प्रवर्गासाठी एक जागा असून त्यासाठी एकूण १८ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. लॅब टेक्निशियन या एका पदासाठी एकूण १९ अर्ज प्राप्त झाले आहेत. फार्मासिस्ट या पदासाठी या दोन जागांसाठी ७६ अर्ज आले आहेत. तर एएनएमसाठी एकूण ३० जागा आहेत. त्यासाठी तब्बल ५६४ अर्ज प्राप्त झाले आहेत. ९ संवर्गापैकी ५ विविध प्रकारच्या वैद्यकिय अधिकारी यांची मुलाखत गुरुवार १८ मे रोजी सकाळी ११ वाजता महापालिका स्थायी समिती बैठक कक्षामध्ये होणार आहे. मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

### या पदासाठी उमेदवारांची थेट नियुक्ती

तसेच ९ संवर्गापैकी फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम. यांची गुणानुक्रमे तक्ता तयार करून समितीसमोर सादर करण्यात येवून त्याबाबतची प्राथमिक स्वरूपाची निवड यादी सोलापूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मंगळवार ३० मे रोजी प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर गुणानुक्रमे अव्वल असलेल्या उमेदवारांची थेट नियुक्ती करण्यात येईल.

### लॅब टेक्निशियन पदाची भरती प्रक्रिया रद्द !

लॅब टेक्निशिएन या पदाच्या बिंदू नामावलीमध्ये सुधारणा झालेली असल्याने लॅब टेक्निशियन पदाची भरती प्रक्रिया रद्द ठेवण्यात येत आहे. जी. एन. एम.चे मानधन १७ हजार असे नमूद असून त्यामध्ये २० हजार रुपये अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन राष्ट्रीय आरोग्य अभियान पदभरती निवड समिती सोलापूर अध्यक्ष तथा महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000027378 E-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:06/2023-24 **Particulars:** Work of Battery Sets & Battery Charger available at various 220/132/110 kV S/stn. & EHV Cogen, Consumers under jurisdiction of EHV O&M Division, Solapur (FY- 2023-24). **Estimated Cost:** Rs. 40,00,000/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 40,000/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST **Sale Period:** 13.05.2023 to 21.05.2023 **Last Date of Submission:** 21.05.2023 up to 23:59 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 22.05.2023 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Superintending Engineer - 7447440608. For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**



## धर्मवीर सामाजिक संस्थेतर्फे शंभूराजे पुरस्कार वितरण

सुराज्य/सोलापूर

निराळे वस्ती भागातील अरविंद धाम पोलीस वसाहतीसमोर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बहुद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे स्वराज्य रक्षण छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६६ व्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना शंभू राजे पुरस्कार २०२३ देऊन गौरविण्यात आले. त्यावेळी इंगडे महाराज बोलत होते.

प्रारंभी प्रमुख पाहुणे आमदार विजयकुमार देशमुख, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, शिवाजी सुरवसे, ज्ञानेश्वर सपाटे, किरण पवार, प्रकाश ननवरे, बापू वाडेकर, बाबा सुर्यवंशी, सचिन चव्हाण यांच्या हस्ते छ. संभाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले तसेच आरती करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर बाल शंभू म्हणून तयार होऊन आलेला शिवरुद्र कारंडे याने गारद बोलून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी प्रमुख पाहुणे यांनी मनोगत व्यक्त करताना कार्यक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमास सुमित सोनके, अमोल सोनके, कृष्णा शिंदे, किशोर कोरके, उमेश माने, ओंकार उकरंडे, गणेश माने, सौरभ कनेरी, समर्थ माने, विकास लटके यांच्यासह बी. एस. मित्र परिवाराचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राहुल बिराजदार व प्रसाद यांनी केले तर आभार अतुल सोनके यांनी केले. यावेळी शुभांगी बुवा (सामाजिक), अंबिका पानघंटे व उज्ज्वला यादव (सुरक्षित विद्यार्थी वाहतूक), तानाजी माने (शैक्षणिक), डॉ. जी. आर. बबलादी (वैद्यकीय), पैलवान राजू सुरवसे (उद्योग), पी. एस. आय. शैलेश खेडकर (पोलीस), नंदकुमार येच्चे (वृत्तपत्र समूह), विशाल भांगे व वैभव गंगणे (इलेक्ट्रॉनिक मीडिया) या विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शंभू राजे पुरस्कार २०२३ देऊन गौरविण्यात आले.

**Returning officer**
**shivprasad multistate sahakari dudh sangh Ltd, dahigaon**
Officer of the returing officer- Assistant registrar co-op society akluj, apmc building akluj,
**Tal- Malshiras, Dist- Solapur**
Mob no :- 8698080887 email :- arcsakluj@gmail.com

**shivprasad multistate sahakari dudh sangh Ltd, dahigson**

Election programme general meeting notice (as per multistate co op societies Act -2002)

In exercise of the power conferred by section 19 (1) and schedule there of (para-1 to 8 of multistate co oprative Socicties rule 2002 and Bye -laws no.32, I M. L.Shinde, returning officer for **shivprasad multistate sahakari dudh sangh Ltd, dahigaon** Dist solapur and assistant Registerar, Co opcrative societies Tal. Malshiras Dist Solapur, hereby notify that, the election programme of the Board of directors of this credit society for the period 2023-2024 to 2028-2029 and general body will be convened as mention below the composition of the Board of Directors to be elected shall be as follows.

| Particulars | No of Directors |
|---|---|
| elected by ordinary member | 7 |
| female member elected by ordinary member | 1 |
| sc/st candidate elected by ordinary members | 1 |
| **Total** | **9** |

**ELECTION PROGRAMME OF BOARD OF DIRECTOR**

| SR. NO. | PERTUCULARS | DATE | TIME | PLACE |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Declaration of Election Programme | 18/05/2023 | 11.00 am | Election office (as above stated) |
| 2 | Publication of provisional list of voters | 18/05/2023 | | Election office (as above stated) |
| 3 | Objections/ Corrections in provisional Voters list | 18/05/2023 22/05/2023 | 11.00 am to 4.00 pm | Election office (as above stated) |
| 4 | Hearing on objections of provisional Voters list | 23/05/2023 | 11.00 am to till the completion | Election office (as above stated) |
| 5 | Publication date and time of Final voters list | 24/05/2023 | 11.00 am | Election office (as above stated) |
| 6 | Date and time for giving and obtaining/filling of nomination forms | 25/05/2023 31/05/2023 | 11.00 am to 4.00 pm | Election office (as above stated) |
| 7 | Date and time for scrutiny of nomination form | 01/06/2023 | 11.00 am to till the completion | Election office (as above stated) |
| 8 | List of valid nominations after scrutiny | 02/06/2023 | 11.00 am | Election office (as above stated) |
| 9 | Withdrawal of nomination form | 02/06/2023 08/06/2023 | 11.00 am to 4.00 pm | Election office (as above stated) |
| 10 | Allotment of symbol and publication of final list of contesting candidates with symbol | 09/06/2023 | 11.00 am | Election office (as above stated) |
| 11 | General body - as mentioned in section 19 and Schedule para 5 of MSCS Rule 2002 the number of candidates whose nomination papers have been declared valid dose not exceed, the number of candidates, the returning officer shall at general meeting declare them to have been duly elected to the board. If the number of candidate whose nominations are valid exceeds the number to be elected, the returning officer shall arrange for conducting poll on the date and time fixed for the purpose and adjourned the general meeting. | 12/06/2023 | 2.00 pm | shivprasad multistate sahakari dudh sangh Ltd, dahigaon |
| 12 | the number of candidate whose nominations are valid exeeds the number to be elected date, time and place of polling. | 18/06/2023 | 08.00 am to 05.00 pm | The venue will announced later |
| 13 | Date of Counting of votes | 18/06/2023 | From 08.00 am till completion of counting of votes and declaration of result | The venue will announced later |
| 14 | Continuation of adjorned general meeting dated | 25/06/2023 | 11.00 am | shivprasad multistate sahakari dudh sangh Ltd, dahigaon |

सही/-
(एम.एल. शिंदे)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

## स्केटिंगने ४५ किलोमीटर अंतर अडीच तासात पूर्ण

सुराज्य/सोलापूर

१४ मे मातृदिनानिमित्त क्रीडा संकुल येथे वयोगटानुसार स्केटींग स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामुळे ४५ कि. मी. प्रवास शनिवार पूर्ण केली.

शुक्रवारी सायंकाळी तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन तुळजापुरातच मुक्काम केला. शनिवार पहाटे ४ वाजता उठून प्रात:काल आटोपून ठीक ५.३० वाजता तुळजाभवानी मातेचे बाहेरुन दर्शन घेऊन फेसबुक लाईव्ह करुन सुरुवात केली. सोबत तिचा भाऊ रघुवीर, सागर वंगारी, लक्ष्मण द्यावरकोंडा, वडील प्रभाकर फलमारी यासोबत होते. रस्त्यामध्ये पाणी पिण्यासाठी दहा मिनिटांची विश्रांती सोडून नॉनस्टॉप सोलापूर रुपा भवानी मंदिरापर्यंत पोहोचले. असे अडीच तासात ४५ कि. मी. प्रवास पूर्ण केला. हे प्रवास भारतमातेच्या चरणी व सर्व मातांचा सन्मानित अर्पण केले. या तुळजाभवानी मातेचे आशीर्वाद लाभले. इन्फिनिटी स्केटिंग क्लासेसमार्फत घेण्यात आलेल्या भव्य स्केटिंग स्पर्धेत आपल्या विनर फाऊंडेशनमार्फत श्रद्धा फलमारी हिने ११ ते १४ वयोगटामध्ये श्रद्धाला द्वितीय क्रमांकावर यश प्राप्त झाले.

## नटराज नृत्य संगीत विद्यालयाचे नेपाळ स्पर्धेत घवघवीत यश

सुराज्य/सोलापूर

नववा आंतरराष्ट्रीय डान्स अँड म्युझीक फेस्टिव्हल काठमांडू, नेपाळ २०२३ येथे झालेल्या स्पर्धेत सोलापुरातील नटराज नृत्य संगीत विद्यालयाच्या एकूण दहा विद्यार्थिनींनी सहभाग घेतला असून सर्वच विद्यार्थिनींना बक्षीस मिळाले आहे. या स्पर्धेत सोलापूर, पुणे, कलकत्ता, ओरिसा, आसाम, आंध्रप्रदेश इ. राज्यातून नृत्य कलाकार आले होते.

गुरु मोनिका द्यावनपल्ली यांना 'नृत्य गुरु गौरी' सन्मान देऊन गौरविण्यात आले. समूह नृत्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. वेदिका आंधळकर आणि मधुरा लातुरे यांना डुएटमध्ये पहिले बक्षीस मिळाले व सौंदर्या वाघमारे व श्रेया उदगिरी यांना डुएटमध्ये शास्त्रीय नृत्यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. रेणू भोसले, त्रिगुणा द्यावनपल्ली, अक्षया भिमनपल्ली यांना एकल नृत्यात प्रथम क्रमांक व रितिका श्रीमल यांना द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

# माजीमंत्री ढोबळे यांच्या वाढदिनी कुस्ती स्पर्धा


सुराज्य/सोलापूर

*भारतीय जनता पार्टीचे प्रांतिक सदस्य व माजी मंत्री लक्ष्मणराव ढोवळे यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर आणि मंगळवेढा येथे शाहू शिक्षण संस्था, बहुजन रयत परिषद, सावली फौंडेशन व महात्मा फुले सूतगिरणी, वाघोली यांच्या वतीने दि.१७ ते १९ मे दरम्यान तीन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विजय पोटफोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.*



बुधवार दिनांक १७मे रोजी सायंकाळी ६ वाजता मंगळवेढा येथे ग्रामस्वच्छता अभियानावर आधारित 'वास इस दास' हे नाटक तसेच निमंत्रित कवींचे कवी संमेलन सायंकाळी ९ वाजता होणार आहे.

गुरुवार दि. १८ मे रोजी सायंकाळी ५ वाजता सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिर येथे प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांचा भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. मधुकर पाटील यांचे 'महाराष्ट्र काल, आज व उद्या' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी सुप्रसिद्ध गायक सलील कुलकर्णी यांच्या गीतांची सुरेल मैफल हा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता मंगळवेढा येथे होणार आहे. दि. १९ मे रोजी ४ वाजता भव्य निकाली कुस्त्याचे जंगी मल्लयुध्द न्यू इंग्लिश स्कूल, मंगळवेढा येथे आयोजित केलेले आहे. या मल्लयुद्धासाठी महाराष्ट्रसह देशभरातून नावाजलेले मल्ल सहभागी होणार आहेत. भारत केसरी पै. सिकंदर शेख आणि हरियाणा केसरी पै. मनजीत खत्री, पै. माऊली जमदाडे आणि पै. योगेश पवार, पै. श्रीमंत भोसले आणि पै. मनोज माने या मान्यवर मल्लांसह अनेक निमंत्रित मल्लांच्या कुस्त्यांचे आयोजन केलेले आहे. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन खासदार धनंजय महाडिक, खासदार डॉ. जयसिद्धेश्ववर महास्वामी, खासदार रणजितसिंह नाईक, आ. रणजितसिह मोहिते पाटील, धवलसिह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते, माजी आमदार राजीव आवळे, माजी आमदार महेश लांडगे, माजी आमदार दिपक साळुंखे, सुजीत कदम यांच्या हस्ते होणार आहे. तसेच कुलगुरू डॉ. आर. के. कामत प्रा. बी.पी. रोंगे, नेते राजाभाऊ सरवदे, अँड. अभिजीत ढोबळे, सिद्राम जावीर, क्रांतीताई आवळे, अँड. कोमलताई साळुंखे, विजय पोटफोडे, मुकुंद शिंदे, प्राचार्य डॉ. मीना गायकवाड, प्राचार्य. एस. आय. नदाफ, प्राचार्य सी. बी. माळी, अंबादास पांढरे, दत्ता पाटील, जनार्दन चव्हाण, , अश्विनी चव्हाण, अमोल कळके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. या पत्रकार परिषदेत प्राचार्य मीना गायकवाड, दत्ता पाटील आदी उपस्थित होते



## स्वेरीमध्ये पीएलसी व एससीएडीएवर पाच दिवसांची कार्यशाळा

**पंढरपूर** : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी) व सुपरवायझरी कंट्रोल अँड डाटा अॅक्विझेशन (एससीएडीए) याविषयी पाच दिवसीय कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या सहकार्याने आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या कार्यशाळेत अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेत मंगळूर (कर्नाटक) मधील इंडवेल ऑटोमेशनचे संस्थापक हिमांशु कुमार यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वेरी नेहमीच प्रयत्नशील असते. त्याचाच एक भाग म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांनी केले. या प्रसंगी बोलताना डॉ.मिनाक्षी पवार म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी सॉफ्ट्वेअर सोबत हार्डवेअर क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करून आपले कौशल्य वाढवावे.' या कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सदर विषयातील मुलभुत संकल्पना ते आधुनिक तंत्रज्ञान व प्रात्यक्षिक अनुभव करून देण्यात आला. यावेळी ट्रेनर हिमांशु कुमार यांनी स्वेरीच्या सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच स्वेरीमध्ये होत असलेल्या विविध विद्यार्थीपूरक उपक्रमांचे कौतुक केले. याप्रसंगी स्वेरी व इंडवेल ऑटोमेशन, मंगळूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. सदर कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील जवळपास शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या कार्यशाळेत प्रा.जगदीश हल्लुर व प्रा.सागर वाघचवरे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन सृष्टी जगदाळे यांनी केले तर प्रा.महुआ बिश्वास यांनी सर्वांचे आभार मानले.

## 'मेघदूत' पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन

**बार्शी** : येथील कवी कालिदास मंडळाच्यावतीने कालिदास महोत्सवाचे औचित्य साधून कवींच्या पहिल्या संग्रहास 'मेघदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या मेघदूत पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी केले आहे. गेली तीस वर्ष कवी कालिदास मंडळ साहित्याच्या क्षेत्रामध्ये कार्य करीत आहे. नवोदित कवींना प्रोत्साहन मिळावे या हेतूने मंडळाच्या वतीने दरवर्षी नवोदित कवीच्या पहिल्या काव्यसंग्रहास मेघदूत पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. त्यानुसार जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहास या वर्षी जून मध्ये संपन्न होणाऱ्या कालिदास महोत्सवामध्ये 'मेघदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्राप्त झालेल्या संग्रहातून दोन संग्रहांची निवड या पुरस्कारासाठी केली जाणार आहे. हे मेघदूत पुरस्कार साहित्यिक पं. ना. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कवी मुकुंदराज कुलकर्णी यांच्यावतीने व ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश गव्हाणे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून कवींनी दि ७ जून २०२३ पर्यंत काव्यसंग्रहाच्या तीन प्रती स्वतःचे छायाचित्र व अल्पपरिचय यासह प्रकाश गव्हाणे, ईश्वरी अभ्यासिका, पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी ता. बार्शी जिल्हा सोलापूर (मो. ९७६३ ४६ ६८ ३०) येथे पाठवाव्यात यावेळी दत्ता गोसावी, प्रा अशोक वाघमारे, सुमन चंद्रशेखर, जयसिंग राजपूत, चन्नबसवेश्वर ढवण, आबासाहेब घावटे, डॉ रविराज फुरडे, शिवानंद चंद्रशेखर, गंगाधर अहिरे आदी उपस्थित होते.

## छ. संभाजी महाराज जयंतीनिमित्त बार्शीत १०१ जणांचे रक्तदान

**बार्शी** : स्व. बापूसाहेब मुळे बहुउद्देशीय संस्था, बार्शी यांच्यावतीने स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळयानिमित्त झालेल्या रक्तदान शिबिरात १०१ जणांनी रक्तदान केले. शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बार्शी शहर समन्वयक प्रा. शरद सावळे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये ऐच्छिक रक्तदात्यांनी मोठ्या उत्साहात रक्तदान केले. सर्व रक्तदात्यास ऐच्छिक रक्तदाता प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी श्रीमान रामभाई शहा रक्तपेढी, बार्शीचे सर्व सदस्य तसेच अंकुर मुळे, विकास झोंबाडे, श्रीहरी यादव, विनोद जगताप, ओंकार मुळे, अर्जुन खारवणे, उमेश नरोटे, रोहित शिंदे, विवेक शेळके, शुभम पावले, स्वप्निल कदम, सुधिर चांदणे, अक्षय गांधले, पियुष घोलप, अजिंक्य कोथिंबीरे, मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व इतर सर्व सदस्य आणि बार्शीतील युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबीरास आप्पासाहेब आगलावे यांनी विशेष सहकार्य केले.

# अक्कलकोट बाह्यवळण रस्त्याचा मार्ग मोकळा

## विस्तारीकरण कामासाठी आणखीन पाच कोटी रुपये मंजूर : आ. कल्याणशेट्टी


**सुराज्य/अक्कलकोट**

**तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहराच्या बाह्यवळण रस्त्याच्या विस्तारीकरण कामासाठी आणखीन पाच कोटी रुपये मंजूर झाले आहे. यामधून मैदर्गी रोडवरील नगरपालिका हद्दीपासून ते सोलापूर रोडवरील रिंगरोड बायपास रस्त्यापर्यंत हा काम होणार आहे. सदर काम पूर्ण होताच अनेक प्रश्न मार्गी लागणार आहेत. अशी माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.**

वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत अक्कलकोट नगरपरिषद ते जिल्हा सोलापूर राष्ट्रीय महामार्गापासून शहराकडे येणारा रस्ता हत्ती तलाव ते श्री स्वामी महाराज व श्री स्वामी सर्मथ अन्नछत्रमंडळ चौकातुन मैंदर्गी रोड न.प. हद्दीपर्यंत श्री. स्वामी महराज भक्त निवासाकडे जाणारा रस्ता विकसीत करणे या कामाकरीता रक्कम पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आला आहे. या कामांकरिता वितरीत करण्यास शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सहा महिन्या पूर्वी याच मार्गासाठी तब्बल १० कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यामधून सदर काम होणार नव्हते. त्यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वाढीव निधीची मागणी केली. त्यास अनुसरून वाढीव निधीस मंजुरी मिळाली आहे. सदर काम पूर्ण होताच या मार्गावर वारंवार होत असलेले वाहतूक कोंडी दूर होणार आहे. वेळेत रिंगरोडला पोहोचण्यासाठी मदत होणार आहे. एकंदरीत प्रवास गतीमान व सुखकर होणार आहे. दिवसंदिवस भाविकांची वाढती गर्दी पाहता सदर रस्ता विस्तारीकरण होणे नितांत गरज होती.





चौकट- अक्कलकोट शहराजवळील बाह्यवळण रस्त्याचे काम पूर्ण होऊन दहा वर्षे लोटून गेले आहे. त्यावेळच्या वाहतुकीचे परिस्थिती पाहवून केले असले तरी सध्या या मार्गावरून वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे रस्ता विस्तारीकरण होणे आवश्यक होते. म्हणून पहिला दहा तर पुन्हा पाच असे १५ कोटी रुपये निधी राज्यातील युती शासनाने मंजूर केले आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. सदर काम पूर्ण होताच वाहतूक व्यवस्था सुधारणार आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

**- आ. सचिन कल्याणशेट्टी**

## नातेपुते येथे मामाश्री प्रतिष्ठानच्या झुणका भाकरी केंद्राचे उद्घाटन

**सुराज्य/नातेपुते**

नातेपुते शहरात परिसरातील अनेक कष्टकरी शेतकरी व इतर नागरिक हे कामानिमित्त अथवा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी नातेपुते येथे ये - जा करीत असतात. त्यांना अल्प दरात जेवणाची सोय उपलब्ध व्हावी हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून नातेपुते दहिगाव रोड बाविस्कर कॉम्प्लेक्स येथे मामाश्री प्रतिष्ठाण बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने झुणका भाकरी केंद्र सुरू करण्यात आले असून त्याचे उद्घाटन सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, अहिल्यादेवी पतसंस्थेचे चेअरमन रघूनाथ कवितके यांच्या शुभहस्ते घेण्यात आले. झुणका भाकरी केंद्रामध्ये झुणका, २ भाकरी, लोणचे, कांदा हे सर्व ४० रुपये व वरण भात ३० रुपयात असे खास जेवण नागरिकांना मिळणार आहे.

नातेपुते शहरात मोठी बाजार पेठ असल्यामुळे नातेपुतेमध्ये व पंचक्रोशीत व्यापारी, फळविक्रेते, मंडई, बाजार इतर कामानिमित्त ये- जा करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच हॉस्पिटलची संख्या पण मोठ्या प्रमाणात आहे. अनेक नागरिक रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येत असतात या सगळ्या गोष्टी लक्षात घेता मामाश्री प्रतिष्ठाण बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने सामाजिक कार्य म्हणून अल्प अशा दरात झुणका भाकरी केंद्र व वरण-भात सुरू केले आहे. **- मामासाहेब पांढरे**
(उपसभापती अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती)



यावेळी उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमूख, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, उद्योजक अतुल बावकर, मोहित जाधव, माळशिरस पंचायत समितीचे सदस्य माऊली पाटील, नगरसेवक अॅड .भानूदास राऊत, रावसाहेब पांढरे,आण्णा पांढरे, रणजित पांढरे , तसेच महेश शेटे,अॅड.शिवाजीराव पिसाळ, समाजभूषण सोसायटीचे चेअरमन विलास काळे, अप्पासाहेब वाघमोडे, उमेश पलंगे, डॉ.नरेंद्र कवितके, आप्पासाहेब भांड, गणेश कुचेकर,लक्ष्मण मगर,बाबा बोडरे, रणजित काळे, आदी मान्यवर उपस्थित होते

## सांगोला शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यालगतचे अतिक्रमण तात्काळ काढावे : अॅड. सोनवणे

**सुराज्य/सांगोला**

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी चौक पंडित जवाहरलाल नेहरू पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर महात्मा फुले या पुरुषांच्या पुतळ्यालगत गेल्या अनेक वर्षापासून हातगाडे व दुकाने यांनी अतिक्रमणे करून दुकाने थाटली आहेत.

तसेच पुतळ्यालगतचे हातगाडे बारा महिने त्याच ठिकाणी उभे असतात त्यामुळे परिसरात घाण देखील पहावयास मिळते. महापुरुषांचा पुतळा समाजात स्मृती व प्रेरणा देत असतात परंतु सांगोला शहरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्यांना हातगाड्यांचा विळखा पडलेला असून सदरील बाब ही आपल्या समाजात अत्यंत अशोभनीय अशी आहे.

सांगोला शहरातील छ. शिवाजी महाराज चौक पं. जवाहरलाल नेहरू पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर महात्मा फुले या पुरुषांच्या पुतळ्यालगत असलेले सर्व हातगाडी व दुकाने यांचे अतिक्रमण तात्काळ कायमस्वरूपी काढून टाकून सदरील हात गाडी व्यवसायिकांनी पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये याकरिता त्यांच्या व्यवसायाकरिता इतर योग्य ठिकाणी पुनर्वसन करून महापुरुषांच्या पुतळ्यांना हातगाड्यांचा अतिक्रमणाचा विळखा काढून टाकण्याची तात्काळ कार्यवाही करावी. अशा मागणीचे निवेदन अॅड. रोहित सोनवणे यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना दिले.

## बचेरी येथे पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई प्रशासन मात्र ठप्प

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील बचेरी गावास गेल्या दोन महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे गामपंचायतीने प्रशासनाकडे टँकरची रितसर मागणी करुन दोन महीने हो ऊन गेले मात्र प्रशासनानेच ग्रामपंचायतीच्या मागणीला चक्क केराची टोपली दाखवलयाचे दिसत आहे.

आता उन्हाळा संपत आला तरीही प्रशासनाला कसलीच जाग आली नाही.बचेरी गावात कमी पण वाड्यावर जास्त लोक राहतात सध्या या भागातील विहीरी पुर्ण पणे कोरड्या पडल्या आहेत सध्या लोक पाण्यासाठी भटकंती करीत आहेत. राजेवाडी येथील सद्गुरू साखर कारखान्याने बचेरी गावाला पाणी दिले आहे पण ते गावातील लोकांमुळेच आहे मग वाड्यावरील लोकांनी काय करायचे .तर पशासनाने बचेरी गावाला मागणी करूनही टँकर का दिला नाही याला मुख्य कारण सद्गुरू साखर कारखान्याने बचेरी गावाला पाणीपुरवठा केला अशी चर्चा झाल्यावर प्रशासनाकडून कोणतीच दखल घेण्यात आली नाही लोकपतिनीधींनी लक्ष देऊन तहानलेल्या बचेरीकरांना पाणी देण्याची व्यवस्था करावी अशी मागणी होत आहे.

## विधवा महिलांनी निर्भयपणे वावरले पाहिजे : पाटील

### अस्तित्व संस्थेने विधवा व एकल महिलांचा मेळावा

**सुराज्य/सांगोला**

गावोगावच्या विधवा व एकल महिलांनी पावरून खचून न जाता समाजामध्ये निर्भयपणे व स्वाभिमानाने वावरले पाहिजे. पोलिस यंत्रणा गरज पडेल तिथे तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले सभागृह सांगोला येथे अस्तित्व संस्थेने आयोजित केलेल्या विधवा व एकल महिलांच्या मेळाव्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी बचत गटाच्या कार्यकर्त्या अश्विनी पाटील होत्या, तर स्वागताध्यक्ष म्हणून अॅड. सुनीता धनवडे होत्या. याप्रसंगी वाणीचिंचाळे गावाच्या सरपंच प्रियांकागडहिरे, अध्यक्ष शहाजी गडहिरे, आरती जगधने, प्रा. तृप्ती बनसोडे, सुनीता गडहिरे, अर्चना खरचे, दीपाली भूसनर, प्रवीण सूर्यागंध, विशाल काटे, विजय धनावडे, संकल्प गडहिरे, खंडेराव लांडगे उपस्थित होते. राजश्री पाटील म्हणाल्या की, विधवा व एकल महिलांनी छोटे छोटे व्यवसाय केले पाहिजेत. मुला-मुलींना शिक्षण दिले पाहिजे. कुटुंबातीलसदस्यांशी समन्वयाने वागले पाहिजे, तर तुमची निश्चित प्रगती होईल. प्रा. तृप्ती बनसोडे म्हणाल्या की, महिलांनी अंधश्रद्धा सोडून दिली पाहिजे. स्वतः वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेऊन स्वतःच्या क्षमता वाढवल्या पाहिजेत. मेळाव्यास सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील बहुसंख्य एकल व विधवा महिला उपस्थित होत्या.

## प्रभारी तहसीलदार लिंबारे यांनी सुट्टीदिवशी केले कामकाज

### संजय गांधी निराधार योजनेचे एकूण २२८ प्रकरणे मंजूर

**सुराज्य/द. सोलापूर**

दक्षिण सोलापूर प्रभारी तहसीलदार पदाचा कार्यभार मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांना देण्यात आला असून राजशेखर लिंबारे यांनी शनिवार रविवार या दोन दिवसाच्या सुट्टीच्या दिवशीही कामकाज करून संजय गांधी निराधार योजनेचे एकूण २२८ प्रकरणे मंजूर केली.

प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी आदेश काढून तहसीलदार दक्षिण सोलापूरच्या प्रभारी तहसीलदार या पदाचा कार्यभार मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांना दिला. राजशेखर लिंबारे यांनी दिनांक ११ मे २०२३० रोजी कार्यभार स्वीकारून त्वरित संजय गांधी निराधार अनुदान समितीचे अधिकारी व कर्मचारी यांची सभा घेऊन प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेऊन शनिवार व रविवार दोन दिवस सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहून विशेष सहाय योजनेअंतर्गत येणाऱ्या संजयगांधी, श्रावणबाळ, राष्ट्रीय वृद्धापकाळ व विधवा या प्रकरणातील सर्व कागदपत्रे तपासणी करून पात्र, अपात्र यादी तयार करणे बाबत सूचना दिल्या.





त्यानंतर त्वरित १५ मे रोजी संजयगांधी निराधार अनुदान समितीची बैठक घेऊन संजय गांधी निराधार योजनेचे ७३, लाभार्थी, श्रावण बाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेचे१०७, राष्ट्रीय विधवा योजनेचे २०, राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेचे २८, असे एकूण २२८ पात्र लाभार्थ्यांचे प्रकरणे मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचे ७ प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. सदर संजय गांधी योजना बैठकिस नायब तहसीलदार आरती दाबडे, अवल कारकून परवीन रंगरेज, महसूल सहाय्यक एस. एल. कुलकर्णी, तसेच आय.टी.असिस्टंट श्रेयस देशपांडे हे उपस्थित होते.

## शहर वासीयांना एका दिवसात दाखला : नदाफ

### १८ मे पासून नॉर्थकोट प्रशालेत महाशिबिराचे आयोजन

**सुराज्य/उ. सोलापूर**

दहावी आणि बारावीच्या संभाव्य निकालाच्या पार्श्वभूमीवर जात प्रमाणपत्र ,उत्पन्न प्रमाणपत्र व क्रिमीलेअर प्रमाणपत्र मागणीसाठी नागरिकांची होणारी गर्दी टाळून एका दिवसात प्रमाणपत्रे मिळावे यासाठी नॉर्थ कोट प्रशालेत आजपासून महा शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे उत्तरचे तहसीलदार नदाफ ह्यांनी सांगितले आहे.

सेतू सुविधा बंद असल्याने, महा ई सेवा केंद्रामध्ये त्यांनी द्यावयाच्या सेवा योग्य पद्धतीने उपलब्ध होत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्याने,मे आणि जून महिन्यामध्ये प्रशासनावर दाखल्यांच्या निर्गतीच्या कामकाजाचे दडपण असले तरीही नागरिकांनी सुलभपणे आणि वेळेमध्ये दाखले मिळावेत, शाळा कॉलेजमधील प्रवेशांमध्ये अडचणी निर्माण होऊ नयेत, याकरिता सोलापूर शहरातील नागरिकांकरिता उत्तर सोलापूर तहसीलदार यांच्यामार्फत शहरात मध्यवर्ती ठिकाणी माहाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. एका दिवसात दाख़ला निर्गमित करण्यासाठी बारा काउंटर लावण्यात येणार आहेत. बारा काउंटरवर महा-ई-सेवा केंद्रांचे ऑपरेटर्स कार्यरत असतील. उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील चार नायब तहसीलदार,, चार अव्वलकारकून ,पाच सर्कल ऑफ़िसर ,पाच लिपिक , सहा तलाठी, दहा कोतवाल व चार ऑपरेटर अशी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती आठवडाभर करण्यात आली आहे. सर्व कामावर तहसीलदार उत्तर सोलापूर हे स्वतः लक्ष ठेवणार असून नागरिकांना दाखल्यांच्या अनुषंगाने असणाऱ्या सुविधा वेळेत मिळतील याबाबत आवश्यक ती दक्षता ते घेतली जाणार आहे. केंद्राकडून शासनाने विहित केलेल्या शुल्का पेक्षा अधिक पैशांची मागणी केल्यास, स् संबंधितांवरती फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात येतील. असा इशारा सर्व महा-ई-सेवा केंद्र चालकांना देण्यात आला आहे . . शहर परिसरातील अधिकाधिक नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काँग्रेसच्या तीन गटाकडून व प्रत्येक समाजाच्यावतीने मंत्रीपदासाठी लॉबी

**सुराज्य/विजयपूर**

***कर्नाटकात कॉंग्रेस पक्षाचे सरकार अधिकारावर येणार हे नक्की असताना मुख्यमंत्री पदी कोण विराजमान होणार याचा फैसला आजच्या घडीपर्यंत झाला नसला तरी मंत्री पदासाठी मात्र जोरदार लॉबी सुरू आहे.***

काँग्रेस पक्षात तीन गट आहेत हे जगजाहीर असून राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा एक गट, मुख्यमंत्री पदाचे दावेदार सिध्दरामय्या व डी के शिवकुमार यांच्या गट अशा तीन्ही गटाकडून आपल्या समर्थकांना मंत्री पदावर वर्णी लावून राज्य मंत्रिमंडळात आपली पकड मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एवढेच नव्हे तर प्रत्येक समाजाच्यावतीने ही आपल्या समाजास मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व मिळावे अशी मागणी जोर धरत आहे.

कुडलसंगम पंचमसाली पीठाचे जगद्गुरु बसवजय मृत्युंजय स्वामींनी पंचमसाली लिंगायत समाजाच्या मतांनीच काँग्रेस पक्ष अधिकारावर आला आहे, लिंगायत समाजाच्या मुख्यमंत्री व्हावे अशी मागणी होती मात्र सिध्दरामय्या व डी के शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्री पदासाठी रस्सीखेच सुरू आहे. ते कोणाला मुख्यमंत्री घोषित करतील हे त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. आमच्या समाजाचे १२ आमदार असून पंचमसाली लिंगायत समाजास उपमुख्यमंत्री पद देण्याबरोबरच जाती जनसंख्या आधारावर मंत्री पदे देण्यात यावी अशी मागणी केली आहे. एवढेच नव्हे तर विरोधी पक्ष भाजपने पंचमसाली लिंगायत समाजाचे बसवनगौडा पाटील यत्नाळ यांना विरोधी पक्षनेते पद द्यावे अशी मागणी केली आहे. तर एकीकडे मुस्लिम समाजही आमच्या समाजाने एकगठ्ठा मते काँग्रेसला दिल्यामुळे काँग्रेस पक्षास बहुमत मिळाले असून आमच्या समाजाचे ९ आमदार विजयी झाले असून त्यांच्या पैकी एकास उपमुख्यमंत्री पद व पाच महत्त्वाचे खात्याचे मंत्री पदे देण्यात यावी अशी मागणी धर्म प्रमुखांनी केली आहे.



प्रादेशिक समानता, धर्म, जातीय आधारावर जवळपास ६६ आमदार मंत्री पदासाठी आपापल्या समाज धर्मगुरू, मठाधीशांकडून दबाव आणून जबरदस्त लॉबी करताना दिसून येत आहेत. आर्य ईडगा महासंस्थान मठाकडून बी.के.हरिप्रसाद, एच.आर. गवीयप्पा, हरीष कुमार, मधु बगांरप्पा, बेळूर गोपाळकृष्णा,भिमण्णा नायक, यांना मंत्रीपद देण्याची मागणी केली आहे.

रेड्डी समाजाच्या वतीने रामलिंग रेड्डी यांना उपमुख्यमंत्री पद व चार आमदारांना मंत्री पद देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. तर धारवाड मुरुघा मठाकडून विनय कुलकर्णी यांना उपमुख्यमंत्री पद द्यावे, विरशैव समाजाच्या वतीने ही निवडणूक आलेल्या पैकी योग्य प्रमाणात मंत्री पद मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे.

## पुणे महापालिकेच्या सेवेत आता तृतीयपंथी!

**सुराज्य/पुणे :** महापालिकेच्या सेवेत तृतीयपंथींची कंत्राटी सेवक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. त्याबाबतच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंजुरी दिली असून महापालिकेच्या मिळकतींच्या संरक्षणासाठी प्रायोगिक तत्त्वावर २५ तृतीयपंथींची नियुक्ती ठेकेदारामार्फत करण्यात येणार आहे. नागरिक हक्क कायद्यानुसार समाजातील सर्वच घटनांना समानतेची वागणूक मिळावी, या उद्देशाने महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. सध्या कार्यरत असलेल्या सैनिक सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड आणि इगल सिक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड या खासगी कंपनींकडून वेतन तसेच सरकारी देयके तृतीयपंथींना दिली जाणार आहेत.

## राज्यात ३१ मेपर्यंत शून्य सावली दिवस

**सुराज्य/चंद्रपूर :** 'शून्य सावली दिवस' हा शब्दच कुतूहल निर्माण करणारा आहे. या दिवशी आपली वर्षभर सोबत राहणारी सावली काही मिनिटांसाठी सोडून जाते. राज्यात ३ मे ते ३१ मे पर्यंत शून्य सावली दिवस अनुभवता येणार आहे. तर विदर्भात १७ मे पासून २८ मे पर्यंत शून्य सावली दिवस अनुभवता येणार आहे. सूर्याचा उत्तरायण आणि दक्षिणायन असा भासमान मार्ग पृथ्वीच्या २३.५० ओ दक्षिण आणि उत्तरेकडे असतो म्हणजेच कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दरम्यान असणाऱ्या सर्व भूभागावर सूर्य वर्षातून दोनदा दुपारी डोक्यावर येतो आणि दोनदा शून्य सावली दिवस येतात.

## दानपेटी, चरण पादुका चोरणाऱ्या तिघांना अटक

**सुराज्य/मालेगाव :** येथील कॅम्प भागातील व्याघ्रंबरी देवीच्या मंदिरातील दानपेटी व चांदीच्या चरण पादुका अशा सुमारे २० हजारांच्या मुद्देमालाची चोरी करणाऱ्या तिघा भामट्यांना कॅम्प पोलिसांनी अटक केली असून एका संशयिताचा शोध घेण्यात येत आहे. १३ मे रोजी पहाटेच्या सुमारास मंदिरातील दानपेटी व चरण पादुकांची चोरी झाली होती. या प्रकरणी पुजारी हरीश मोरे यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपासात चार संशयितांनी हे कृत्य केल्याची माहिती पुढे आली. त्यानुसार राहुल नंदावले (२०, रा. भायगाव शिवार), अजय परदेशी (२०, रा. मोतीबाग नाका) आणि दीपेश ऊर्फ चिल्या गवळी (रा. गवळी वाडा) या तिघांना अटक करण्यात आली आहे.

## नाशिक महामार्गावर वाहन चालकाची लूट

**सुराज्य/नाशिक :** नाशिक ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर एका वाहन चालकाला लुटण्याचा प्रकार घडला. या प्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर गवंडगाव टोल नाक्याजवळ अशोक निकम हे चारचाकी वाहनात आराम करीत असताना संशयित सुकदेव मोरे (२७, रा. राहता) आणि विकास कांबळे (२४, रा. राहता) यांनी गाडीची काच फोडून वाहनात प्रवेश केला. कोयत्याचा धाक दाखवीत निकम यांच्याकडे असलेले दोन हजार रुपये, पाच हजार रुपयांचा भ्रमणध्वनी, चार हजार ३०० रुपये असा २३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हिसकावून नेला. त्यांना न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## बिल्डरची फसवणूक, दोघांवर गुन्हा दाखल

**सुराज्य/नागपूर :** बिल्डरची फसवणूक केल्याप्रकरणी क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चरच्या दोन संचालकांना हुडकेश्वर पोलिसांनी अटक केली तर अन्य तिघे फरार झाले आहेत. पांडुरंग महादेव मुलार (नंदनवन), नितीश कृष्णराव तुंगार (रेशीमबाग), विलास श्रीराम मूर्ती (रमनामारोती), सुभाष दयाराम लांबट (रेणूकामातानगर) आणि जितेश नामदेव मदनकर यांनी क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चर नावाने कंपनी स्थापन केली. २०१२ मध्ये हुडकेश्वरातील एका भूखंडावर फ्लॅट स्किम बांधण्याची घोषणा केली. त्यासाठी २०२२ पर्यंत संचालकांनी अनेकांकडून लाखो रुपये घेतले. मात्र, बांधकाम केले नाही. शेवटी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने गुंतवणूकदारांनी कोतवाली पोलीस ठाण्यात क्रिएटीव्ह इंफ्रास्ट्रक्चरच्या संचालकांच्या विरुद्ध तक्रार केली.

## नितीन गडकरी यांना पुन्हा फोनद्वारे धमकी

**सुराज्य/नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आलीय. अज्ञात आरोपींनी फोन करून नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. विशेष म्हणजे नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी देण्याची ही तिसरी वेळ आहे. याआधी देखील नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. पोलिसांनी या प्रकरणी काही आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आलेली. पण त्यानंतरही पुन्हा तसाच प्रकार समोर येताना दिसत आहे.

## आम्ही विश्वासघात करीत नाही : उदयनराजे

**सुराज्य/वाई :** कर्नाटक येथील विधानसभेचा निकाल हा सर्वच पक्षांना आत्मचिंतनासाठी महत्त्वाचा आहे. सर्वच पक्ष यावर आत्मचिंतन करतील असे सांगत खासदार उदयनराजे भोसले यांनी शरद पवार यांनी साताऱ्यात त्यांच्यावर केलेल्या टीकेला मी राजीनामा दिला मागं घेतला का त्यांनी राजीनामा दिला मागे घेतला त्याबद्दल त्यांना विचारा मात्र आमच्या घराण्याला विश्वासघात करण्याची परंपरा नाही, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरही टीका केली.

## हज यात्रेकरूंसाठी पवारांचे ईराणी यांना पत्र

**सुराज्य/मुंबई :** हज यात्रेसाठी महाराष्ट्रातून लाखो मुस्लीम यात्रेकरू हजला जातात. हज यात्रेकरूंना सरकारकडून अनेक प्रकारच्या सुविधाही दिल्या जातात.

यावर्षी हज यात्रेला जाण्यासाठी संपूर्ण भारतात एकूण २२ विमानतळांवर एम्बर्केशन पॉइंटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पण, मुंबई एम्बर्केशन पॉइंटच्या तुलनेत औरंगाबाद एम्बर्केशन पॉइंटवरून हजला जाणाऱ्या यात्रेकरूंकडून ८८ हजार रुपये जास्तीचे आकारले जात आहेत. त्यामुळे मराठवाड्यात राहणाऱ्या हज यात्रेकरूंनी याविरोधात आवाज उठवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी यासंदर्भात अल्पसंख्याक मंत्री स्मृती इराणी यांना पत्र लिहिलं आहे. मुंबई आणि औरंगाबादवरून हजला जाणाऱ्या यात्रेकरूंकडून समान शुल्क आकारलं पाहिजे, अशी मागणी शरद पवार यांनी केली.

# घ्या 'मशाल' आणि लागा कामाला

## जिल्हा प्रमुखांच्या बैठकीत उध्दव ठाकरेची गर्जना



**सुराज्य/मुंबई**

**राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका देखील याचवर्षी लागण्याचे संकेत भाजपकडून देण्यात आलेले आहेत. याच पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून बैठकांचे सत्र सुरू करण्यात आलेले आहे. ठाकरे गटाने देखील आज राज्यातील जिल्हा संपर्क प्रमुखांची बैठक बोलावली होती. यात ठाकरे गटाने अमरावती लक्ष्य केले आहे असून 'घ्या हाती मशाल आणि कामाला लागा' असा आदेश उध्दव ठाकरे यांनी दिला आहे.**

राज्यातील सत्ता संघर्षाचा निकाल सुप्रीम कोर्टाने सुनावताच ठाकरे गट ॲक्शन मोडमध्ये आला आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका देखील याचवर्षी लागण्याचे संकेत भाजपकडून देण्यात आलेले आहेत. याच पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून बैठकांचे सत्र सुरू करण्यात आलेले आहे. ठाकरे गटाने देखील बुधवारी राज्यातील जिल्हा संपर्क प्रमुखांची बैठक बोलावली होती. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी विधानसभा आणि लोकसभांबाबत रणनिती आखण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. ठाकरे गटाकडून आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत प्रामुख्याने छत्रपती संभाजी नगर लोकसभा मतदारसंघ आणि अमरावती लोकसभा लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. कोणत्याही परिस्थितीत या मतदारसंघातून या दोन्ही मतदारसंघातून उमेदवार विजयी करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटातून माजी खासदार चंद्रकांत खैरे किंवा विधान परिषदेवरील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. तर अमरावतीतून खासदार नवनीत राणा यांच्या विरोधात सुषमा अंधारे यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. परंतु, अमरावतीची जागा ही राखीव आहे आणि मी त्या प्रवर्गात बसत नसल्याने या चर्चा निरर्थक आहेत. माझ्यापर्यंत लोकसभा लढण्यासंदर्भात कोणतीही चर्चा झाल्याची माहिती नाही, अशी माहिती ठाकरे गटाच्या महिला उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याकडून देण्यात आली आहे.

सत्तासंघर्षाच्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे वास्तव तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत आणि जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी निकालाची प्रत आणि त्यातील ठळक मुद्दे जिल्हा प्रमुखांना समजून सांगितले असून त्यांना तळागाळातील कार्यकर्त्यांना समजवून सांगायचे आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आपल्याच बाजूने लागला असून सकारात्मक मुद्दे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या कामाची जबाबदारी या जिल्हाप्रमुखांकडे देण्यात आली आहे. या बैठकीत जिल्हा प्रमुखांच्या शंकांचे निरसन आणि प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. याशिवाय आगामी निवडणुकांबाबत काहीच चर्चा झाली नसल्याचेही अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### मेळावा आणि वर्धापन दिन आनंदोत्सवात होणार साजरा

शिवसेना पदाधिकाऱ्यांचा पुढील महिन्यात १८ जून रोजी मुंबईत भव्य मेळावा होणार आहे आणि यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी (१९ जून) होणारा शिवसेनेचा वर्धापन दिन आनंदोत्सवात साजरा होणार आहे.

# मुकेश अंबानींच्या घरासमोर स्फोटके ठेवण्याची कल्पना फडणवीसांचीच

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा गंभीर आरोप

**सुराज्य/मुंबई**

मुकेश अंबानी यांच्या अँटेलिया या निवासस्थानासमोर स्फोटकांनी भरलेली गाडी उभी करणे, अनिल देशमुखांवर १०० कोटींच्या वसुलीचे आरोप करणे हे सगळं महाविकास आघाडीला बदनाम करण्यासाठी ठरवून केलं होतं. त्यामागे देवेंद्र फडणवीस होते मी ते विधानसभेतही म्हटलं होतं. आता ते स्पष्ट झालं आहे असं म्हणत नाना पटोलेंनी गंभीर आरोप केला आहे. तसेच परमबीरसिंह हे फडणीवस यांचे बाहुले आहेत, असेही पटोले यांनी म्हटले आहे. आता याबाबत देवेंद्र फडणवीस काही उत्तर देणार का हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

प्रसिद्ध उद्योजक मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील घराजवळ (अँटेलिया) २५ फेब्रुवारी २०२१ च्या संध्याकाळी साडे सहा-सात वाजेच्या सुमारास एक संशयित कार आढळून आली होती. या कारबाबत माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन कारची तपासणी केली होती. त्यावेळी



कारमध्ये काही जिलेटीनच्या कांड्या सापडल्या होत्या. जेव्हा याबाबतची माहिती माध्यमांसमोर आली तेव्हा संपूर्ण देशात अक्षरश: खळबळ उडाली. एवढंच नव्हे तर त्याच दिवशी पोलिसांच्या हाती एक सीसीटीव्ही फुटेज देखील लागलं. ज्यामध्ये दिसून आलं की, एका व्यक्तीने स्कॉर्पिओ कार अँटेलिया बाहेर पार्क केली होती आणि नंतर तो मागे उभ्या असलेल्या इनोव्हा कारमधून निघून गेला होता. या संपूर्ण प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेता गृहमंत्री अनिल देशमुख यांनी हे प्रकरण मुंबई क्राईम ब्रांचकडे चौकशीसाठी सोपवलं होतं. तेव्हा या प्रकरणाचे तपास अधिकारी हे सचिन वाझे हे होते, असे पटोले म्हणाले.

# शिंदे सरकारच सत्तेत राहण्याची शक्यता बळावली



**सुराज्य/मुंबई**

शिंदे-ठाकरे गटातील मुद्यावर सर्वात मोठा आणि ऐतिहासिक आदेश देताना सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने म्हटले आहे की, 'राज्यपाल कोश्यारी यांनी शिंदे यांना नवीन सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करणे योग्य होते कारण ठाकरे यांनी फ्लोअर टेस्टपूर्वीच राजीनामा दिला होता तर दुसरीकडे आमदारांना अपात्र ठरविण्यासाठी नियमानुसार विधानसभा अध्यक्षांना यापुढील निर्णय घ्यावा लागणार आहे.

मात्र, सर्वोच्च नायायालयाने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने केलेल्या याचिकेवरील निर्णय देताना अनेक मुद्दे खोडून काढले आहे त्यामुळे शिंदे सरकार हेच सत्तेवर कायम राहतील अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.'

अधिक माहितीनुसार शिंदे-ठाकरे गटातील मुद्यावर सर्वात मोठा आणि ऐतिहासिक आदेश देताना, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने सांगितले की, राज्यपाल कोश्यारी एकनाथ शिंदे यांना नवीन सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करणे योग्य होते कारण उद्धव ठाकरे यांनी फ्लोअर टेस्ट पूर्वीच राजीनामा दिला होता. तर दुसरीकडे उद्धव ठाकरेंनी मागितलेला दिलासा सर्वोच्च न्यायालयाने अनेक मुद्द्यांचा विचार करत निर्णय दिले. त्यात एक प्रकारे उद्धव ठाकरे यांच्या मुद्द्यांना फेटाळले असे म्हणावे लागेल, या मुद्द्यांचा विचार केल्यास एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यासाठी आणि सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित कराण्याबाबतचा राज्यपालांचा दि. ३० जून २०२२ चा निर्णय रद्द करा असे म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांनी राजीनाम्याचा घेतलेला निर्णय हा सत्ता बदलासाठी कारणीभूत ठरला असल्याच्या निर्वाळा आता झाला आहे. त्यामुळे येत्या काळात सत्तेचा मार्ग तसेच आमदारांना अपात्र करण्याचा खडतर मार्ग उद्धव ठाकरे यांच्यासाठी खडतर आहे असे दिसून येत आहे.

# उद्धव ठाकरे दंगलींमागचे मास्टरमाईंड

## नितेश राणेंचा आरोप; तर संजय शिरसाटांचा थेट मातोश्रीवर आरोप

**सुराज्य/मुंबई**

महाराष्ट्रात २००४ साली झालेली दंगल घडवण्यात शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा हात होता का? याची चौकशी पोलिसांनी करावी. तसेच उद्धव ठाकरेंची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी भाजपा आमदार नितेश राणे यांनी केली आहे. नितेश राणे म्हणाले, पुन्हा एकदा महाराष्ट्रात दंगल घडवण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्लॅन आहे का याचा तपास केला पाहिजे.

उद्धव ठाकरे तीन दिवसांपूर्वी अकोला आणि नगरच्या शेवगावात झालेल्या दंगलींमागचे मास्टरमाईंड असल्याचा आरोपही राणे यांनी केला आहे. दरम्यान, आता या दंगलींची आणि नितेश राणे यांनी केलेल्या आरोपांची एसआयटीमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी करून थेट मातोश्रीवरच बोट दाखविले आहे.

संजय शिरसाट म्हणाले, 'भाजपा आमदार नितेश राणे यांनी जे आरोप केले आहेत ते खूप गंभीर आहेत. तिथे (मातोश्री-उद्धव ठाकरे यांचं निवासस्थान) झालेली बैठक, त्या बैठकीत असलेला नेता, लोकाधिकार समितीचा सरचिटणीस, या घटनांकडे गांभीर्याने पाहिलं पाहिजे. या छोट्या मोठ्या दंगलींमागे कोणाचा हात आहे, हे तपासलं पाहिजे.'

आमदार संजय शिरसाट म्हणाले, 'त्या बैठकीची (नितेश राणे यांनी उल्लेख केलेल्या २००४ च्या बैठकीची) पुनरावृत्ती होतेय का? त्याचा पार्ट टू होतोय का? हे तपासलं पाहिजे. तसेच या सगळ्या प्रकाराचं समर्थन हेच लोक करतायत. आपल्या राज्यात दंगली होणं योग्य नाही. यांनी (महाविकास आघाडी)



अडीच वर्षे सत्ता भोगली, आता ती सत्ता पुन्हा मिळवण्यासाठी पुन्हा तोच प्रकार होतोय का? मला मातोश्रींवर थेट आरोप करायचा नाही, परंतु सत्य समोर आलं पाहिजे.' शिरसाट पुढे म्हणाले की, 'नितेश राणे यांनी केलेल्या आरोपांची चौकशी झाली पाहिजे. त्यात काही तथ्य नसेल तर हरकत नाही, परंतु एसआयटी चौकशी झालीच पाहिजे. मी यासंबंधी गृहमंत्र्यांकडे मागणी करणार आहे.'

## मुंबई उपनगरात उष्माघाताचा ताप

**सुराज्य/मुंबई :** मुंबई आणि उपनगरात एप्रिलपासून उन्हाचा तडाखा वाढला असून उन्हाच्या वाढत्या झळांमुळे उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. मुंबई उपनगरात अवघ्या महिनाभरात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत दुपटीने वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे, तसेच रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. मार्चपासून वाढत्या उष्म्यामुळे नागरिकांना उष्माघाताच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यातच उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असल्याने उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे.



राज्यात आतापर्यंत उष्माघाताचे १६१६ संशयित रुग्ण सापडले असून, त्यातील १४७७ रुग्ण उष्माघाताचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत १६ मेपर्यंत उष्माघाताचे १५५ संशयित रुग्ण सापडले आहेत. मुंबईत दिवसेंदिवस वाढत असलेल्या उष्म्यामुळे महिनाभरात उष्माघाताच्या रुग्ण संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. मुंबईत १२ एप्रिलपर्यंत उष्माघाताचे ७२ संशयित रुग्ण सापडले होते, तर १६ मेपर्यंत या रुग्णांची संख्या १५५ वर पोहोचली.

# निवडणुकांसाठी राष्ट्रवादीचे तगडे प्लॅनिंग

## १८ नेत्यांवर जबाबदारी : सोलापूरची जबाबदारी आ. अशोक पवार व चेतन तुपेंकडे

**सुराज्य/मुंबई**

**पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सर्वच राजकीय पक्षांच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. राज्यातील व देशातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी पक्षाच्या सद्यस्थितीचा यावेळी आढावा घेतला. तसंच पक्षसंघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने बूथ कमिटी बांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून यासाठी १८ नेत्यांवर महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**

एकीकडे बूथ कमिटी बांधण्याचा उपक्रम राबवण्यात येत असतानाच महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळाही मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा निर्णय राष्ट्रवादीकडून घेण्यात आला आहे.

राज्यभरातील आमचे पदाधिकारी शिवराज्याभिषेक सोहळा भव्य-दिव्य पद्धतीने साजरा करतील, असं राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीनंतर म्हटलं आहे. तसंच राष्ट्रवादी पक्षाच्या वर्धापनदिनाचा यंदाचा कार्यक्रम अहमदनगरमध्ये होणार असल्याचं पाटील यांनी सांगितले.

### कोणत्या विभागात कोण असणार प्रमुख?

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पक्षाला चांगलं यश मिळवायचं असेल तर बूथ स्तरावर पक्ष मजबूत स्थितीत असला पाहिजे, असा विचार करून शरद पवार यांनी १८ नेत्यांवर याबाबतची जबाबदारी सोपवली आहे



१. जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये अनिल भाईदास पाटील बूथप्रमुख म्हणून काम पाहतील, तर सहबूथप्रमुखपदाची जबाबदारी खडसे कुटुंबावर असणार आहे. २. मराठवाड्यातील जिल्ह्यांसह नाशिक आणि अहमदनगरमध्ये धनंजय मुंडे हे बूथप्रमुखपदाची धुरा सांभाळणार असून विक्रम काळे आणि सतीश चव्हाण यांच्याकडे सहबूथप्रमुखपद असेल. ३. कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादीचे विधानपरिषद आमदार शशिकांत शिंदे यांच्यावर बूथप्रमुखपदासाठी विश्वास दाखवण्यात आला असून अरुण लाड हे सहबूथप्रमुख म्हणून त्यांना साथ देणार आहेत. ४. पुणे शहर आणि जिल्ह्यात मावळचे डॅशिंग आमदार सुनील शेळके यांना बूथप्रमुख म्हणून काम पाहण्यास सांगण्यात आलं असून सहबूथप्रमुखपद चेतन तुपे यांच्याकडे असणार आहे. ५. सोलापूर जिल्ह्याची जबाबदारी आमदार अशोक पवार आणि चेतन तुपेंकडे देण्यात आली आहे. ६. ठाणे-पालघर या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा प्रभाव असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादीचा झेंडा फडकवण्यासाठी जितेंद्र आव्हाड यांना ताकद देण्यात आली असून सुनिल भुसारा हे सहबूथप्रमुख म्हणून काम पाहतील. ७. कोकणात अनिकेत तटकरे हे बूथप्रमुख असीतल तर शेखर निकम हे सहबूथप्रमुख म्हणून त्यांना मदत करतील. ८. विदर्भ नागपूर विभागात अनिल देशमुख यांच्यावर विश्वास दाखवत राष्ट्रवादीने त्यांना बूथप्रमुख दिलं असून मनोहर चंद्रिकापुरे हे त्यांचे सहकारी असतील. ९. विदर्भ अमरावती विभागात राजेंद्र शिंगणे यांच्या खांद्यावर बूथप्रमुखपदाची जबाबदारी सोपवण्यात आली असून प्रवक्ते म्हणून पक्षाची बाजू मांडणारे आमदार अमोल मिटकरी हे या विभागात सहबूथप्रमुख असणार आहे.

# भाजप सरकारच्या विरोधात काँग्रेसचे बोंबाबोंब आंदोलन

## नवीन जी.आर.काढून सं.गा.यो.तील लाभार्थी कमी करण्याचे षड्यंत्र; आ.प्रणिती शिंदे यांचा आरोप

✔ सुराज्य/सोलापूर

संजय गांधी निराधार आणि श्रावण योजनेच्या लाभार्थ्यांना २१ हजारांचे उत्पन्न दाखला आणि हयात दाखले दरवर्षी सादर करण्याच्या सक्ती भाजप सरकार करत आहे. नवीन जी. आर. काढून संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थी कमी करण्याचे षड्यंत्र सरकार कडून सुरू असल्याचा आरोप आ. प्रणिती शिंदे यांनी करत नवीन जी.आर.ची होळी केली. भाजप सरकारच्या शासन निर्णयाची आमदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने ७० फुट भाजी मार्केट चौक होळी करून भाजप सरकारच्या नावाने बोंबाबोंब करण्यात आले, त्यावेळी आ.शिंदे बोलत होत्या.

यावेळी बोलताना आमदार प्रणिती शिंदे म्हणाले की, २०१९ साली तत्कालीन भाजपा सरकारने संजय गांधी निराधार आणि श्रावण योजनेच्या लाभार्थ्यांनी हयात दाखला आणि २१ हजारांचे उत्पन्न दाखले दरवर्षी सादर करावे असा निर्णय घेतला. आणि जे सादर करत नाहीत त्यांचे अनुदान बंद करण्याचे आदेश दिले.

महाविकास आघाडी सरकारने दाखल्याची सक्ती न करता पूर्वीप्रमाणे अनुदान वाटप सुरु ठेवले पण आत्ता दाखले सादर करण्याची सक्ती केली जात आहे. पण ज्या लाभार्थ्यांना सर्व कागदपत्रे, उत्पन्न दाखला देऊन योजना लागू झाली त्यांच्याकडून वारंवार उत्पन्न दाखला आणि हयात दाखला दरवर्षी घेण्याची गरज काय? असा सवाल आ. शिंदे यांनी केला. सध्या सेतु कार्यालय बंद आहे. शासनाकडून त्याचे टेंडर काढले जात नाही. महाईसेवा केंद्रातुन जास्त पैसे घेतले जातात वृद्ध, गरीब, अशिक्षित लाभार्थ्यांना एकविस हजाराचे उत्पन्न दाखले दिले जात नाहीत. यासाठी त्यांना वणवण फिरावे लागत आहे. मग दाखले कुठून सादर करायचे, असेही शिंदे म्हणाल्या. यावेळी अध्यक्ष चेतन नरोटे, संजय हेमगड्डी, जेष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री, रियाज हुंडेक़री, प्रवीण निकाळजे, आरिफ शेख, हाजी तौफ़िक़ हत्तूरे, विनोद भोसले, रमेश राठी, परवीन इनामदार,



### सरकारकडून सर्व योजना बंद करण्याचे काम

काँग्रेसच्या योजनेमुळे निराधार गोर गरीबांना एक हजार पेंशन मिळायचे ही योजना बंद पाडायची आहे. या आठ नऊ वर्षात मोदी सरकारने आणि भाजपने गोरगरीबांसाठी एकही योजना आणली नाही, उलट सर्व योजना हे सरकार बंद पाडत आहे. हे मायबाप सरकार नसून पन्नास खोक्याचे सरकार आहे, असे शिंदे म्हणत कार्यालय चालु करून निराधार आणि नागरिकांना लवकरात लवकर सर्व दाखले देण्यात यावे अशी मागणी केली.

अनुराधा काटकर, अंबादास करगुळे, भीमाशंकर टेकाळे, वाहिद बीजापुरे, ब्लॉक अध्यक्ष देवाभाऊ गायकवाड, लक्ष्मीकांत साका, तिरुपती परकीपंडला, नागेश बोमडयाल, अंबादास नडगिरी, श्रीकांत वाडेकर, नरेश येलूर, महेंद्र शिंदे, नागनाथ शावने, शिवानंद बळूरगी, आनंद गायकवाड़, परशुराम जाधव, बसु कोळी, लक्ष्मण पडोरे, परशुराम आनंदकर, सूरज चव्हाण, हूसेन शेख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## नाना पटोले सोलापूर दौऱ्यावर

### शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन करणार; मेळाव्यास राहणार उपस्थित

✔ सुराज्य/सोलापूर



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे रविवार २१ मे रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि कार्यकर्त्यांची बैठक होणार आहे. काँग्रेसचे बडे नेते रविवारी सोलापुरात आहेत. या दौऱ्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते काँग्रेसमध्ये प्रवेश करतील असे सांगण्यात आले होते. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा रविवारचा दौरा निश्चित झाला आहे.

२१ मे २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता - मुंबई येथून विमानाने सोलापूरकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता - सोलापूर विमानतळ येथे आगमन. सकाळी ११.३० वाजता - आमदार प्रणिती शिंदे यांच्या विशेष निधीमधून बांधण्यात आलेल्या एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्राचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी १२ वाजता - आमदार प्रणिती शिंदे यांच्या विशेष निधीमधून शुभराय आर्ट गॅलरीचे नुतनीकरण इमारतीचे भूमिपूजन समारंभ, दुपारी १२.३० वाजता - हुतात्मा स्मृती मंदिरात काँग्रेस कार्यकर्ता मेळावा. दुपारी १.३० वाजता - माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या जनवात्सल्य निवासस्थानी आगमन व राखीव. सायंकाळी ५ वाजता - सोलापूर येथून उमरगा (जि. धाराशिव) कडे प्रयाण. सायंकाळी ५.४५ वाजता - उमरगा येथे महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील यांच्या मुलाच्या लग्न सोहळयास उपस्थिती. असा त्यांचा दौरा आहे.

## सोरेगावात मोटारीच्या धडकेने पादचारी महिला ठार

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर-विजयपूर महामार्गावरील सोरेगाव येथे वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने रस्ता ओलांडणारी महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली.

हा अपघात रात्रीच्या सुमारास घडला. श्रीदेवी श्रीशैल माशाळे (वय ३० रा. नाविदगी ता.अक्कलकोट) असे मयत महिलेचे नाव आहे. ती काल रात्री ९ वाजेच्या सुमारास मुलगा बाबू (वय ७ वर्षे) याच्यासोबत सोरेगाव येथील बनसिद्ध नगर येथून रस्ता ओलांडत होती. त्यावेळी सोलापूरच्या दिशेने जाणारी मोटर धडकल्याने दोघेही गंभीर जखमी झाले होते . त्यांना शासकीय रुग्णालयात महादेव (भाऊ) यांनी उपचारासाठी दाखल केले असता ती पहाटेच्या सुमारास मरण पावली. या अपघाताची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## प्रभू श्रीरामचंद्र हे जगाच्या न्यायाचे रक्षक : आफळे

### कुचन प्रशालेतील श्रीराम कथेचा समारोप

✔ सुराज्य/सोलापूर

शत्रूला संपविण्यासाठी सर्वप्रथम शत्रूच्या समर्थकांना नष्ट करावे लागते, हे नितीतत्त्व प्रभू श्रीरामचंद्रानी समाजासमोर ठेवले. प्रभू श्रीरामचंद्र हे जगाच्या न्यायाचे रक्षक आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. चारुदत्त बुवा आफळे यांनी केले.

अखिल भारत पद्मशाली पुरोहित वैदिक ज्ञानपीठम, पूर्व विभाग मध्यवर्ती महामंडळ, श्रीराम जन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कुचन प्रशालेत



आयोजित श्रीराम कथेचा बुधवारी समारोप झाला. यावेळी ह. भ. प. चारुदत्त बुवा आफळे यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी संजय साळुंखे, पुरूषोत्तम उडता, आकाश शिरते, संजय होमकर, डॉ. संदिप संगा, श्रीनिवास संगा, सूर्यकांत जिंदम, अनिल वंगारी, श्वेता मंचाल, दादासाहेब सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती. आफळे बुवा म्हणाले, मारुतीराय सेवाभावाचे प्रतिक आहे. ज्याच्याकडे सत्ता, श्रीमंती असते त्याची सेवा अनेकजण करतात. परंतु सज्जन संकटात असताना त्यांची मदत सेवाभावाने करणे महत्वाचे आहे. हे महान कार्य हनुमंतरायांनी केले. अधर्माने वागणाऱ्या वालीला त्याच्याच पध्दतीने धडा शिकवून आदर्श प्रस्थापित केला, असेही आफळे बुवा यांनी सांगितले.

## शटर उचकटून साहित्य पळवले

✔ सुराज्य/सोलापूर

कस्तुरबा नगर येथील मल्लिनाथ रेवण्णा हन्नुरे (वय-५१, रा.ताई चौक,धनलक्ष्मी नगर, स्वागत नगर) यांच्या कारखान्याचे शटर उचकटून हॉलमधील ग्रॅन्डीग मॅग्नेट बेड, ग्रॅन्डीग मशीन ऑईल पॉवरटॅक आदी ८५ हजाराचे साहित्य अज्ञाताने चोरले.

ही घटना १ ते ११ मे दरम्यान घडली. याप्रकरणी हन्नुरे यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## भरधाव वेगाने येणाऱ्या कारची वृध्दाला धडक

✔ सुराज्य/सोलापूर

नातवांना फळे आणण्यासाठी जाताना करली चौक येथे भरधाव वेगाने येणाऱ्या कारने फिर्यादी सुजाता बालाजी बिर्रे (वय-२८,रा.अंबिका नगर,निलम नगर) यांचे वडील श्रीनिवास करली (वय-७०) यांना धडक दिली. यात करली हे गंभीर जखमी झाले.ही घटना १५ मे रोजी घडली.याप्रकरणी बिर्रे यांच्या फिर्यादीवरून एका कारचालकावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## आरटीई अंतर्गत १३३९ विद्यार्थ्यांनी घेतला मोफत प्रवेश

### २२ मे पर्यंत मुदतवाढ

✔ सुराज्य/सोलापूर

शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अंतर्गत मुलांना मोफत प्रवेश देण्यात येतो. या अंतर्गत प्रवेश घेताना आधी सर्व्हरच्या तर आता कागदपत्रांची पूर्तता करण्यास अडचणी येत असल्याने जिल्ह्यात फक्त १३३९ विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळाला आहे.

आरटीई' अंतर्गत विद्यार्थ्यांना खासगी शाळेत मोफत प्रवेश देण्यात येतो. ही प्रक्रिया सुरू आहे. अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश घेता आला नाही. त्यामुळे प्रवेशाची अंतिम मुदत १५ मेपर्यंत वाढविण्यात आली होती. या





मुदतीपर्यंतही अनेकांनी प्रवेश घेतला नाही. त्यामुळे आता २२ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

अनेक विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असून, प्रवेश पडताळणी समितीमार्फत या त्रुटी दूर करण्यासाठी पालकांना मुदत देण्यात आली आहे. अशा पालकांना २२ मे पर्यंत त्रुटी दर करून कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. त्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. यंदाच्या वर्षी आरटीई'साठी सोलापूर जिल्ह्यातून २९५ शाळांनी नोंदणी केली आहे. २३२० जागांवर मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. जिल्ह्यातून ७,७३८ पालकांनी आपल्या मुलांसाठी अर्ज सादर केला आहे. त्यापैकी २ हजार १६० मुलांची निवड झाली असून, आतापर्यंत १३३९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

## स्टेट बँक कॉलनीत घरफोडी; दोन लाखांचा ऐवज लंपास

✔ सुराज्य/सोलापूर



पुतण्याच्या साखरपुड्यासाठी गेलेल्या वृद्धाचे घर फोडून कपाटातील दोन लाखांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने पळविले. याबाबत हेमंत मधुकरराव वैद्य (वय-७०,रा.स्टेट बँक कॉलनी) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी वैद्य हे व त्यांचे कुटुंबीय हे १३ ते १५ मे दरम्यान पुतण्याच्या साखरपुड्यासाठी पुणे येथे गेले होते. तेव्हा चोरट्याने त्यांच्या घराचा दरवाज्याचा कडी कोयंडा उचकटून घरात प्रवेश करत देव घरातील लोखंडी कपाटातील लॉक उचकटून कपाटातील १ लाख ९१ हजारांचे साने व चांदीचे दागिने चोरले. यात सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचे अमेरिकन डायमंडची अंगठी, सोन्याची अंगठी, सोन्याची चेन, कानातील झूबे आदी ऐवजाचा समावेश आहे. याबाबत अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सपोनि पवार करत आहेत.

## विजापूर रोडवरील ४०० रहिवांशाची घरे पाडण्यास स्थगिती

✔ सोलापूर : झोपडपट्टी क्रमांक १ व २, सोनियानगर, आम्रपाली चौक, रेवणसिद्धेश्वर झोपडपट्टी, विजापूर रोड, या भागातील ४०० रहिवाशांना रेल्वे विभागाकडून घर जागा पाडकामाबाबत नोटीस देण्यात आली होती. त्यांना कोर्टाकडून दिलासा मिळाला आहे. कोर्टाने ५ जूनपर्यंत कोणतेही पाडकाम न करण्याचे आदेश दिले आहेत. नोटीस मिळालेल्यांपैकी जाकिर शेख, मौमुना पिरजादे यांच्यासह ९ जणांनी जिल्हा न्यायालयात ड. व्ही. एस. आळंगे, ड अमित आळंगे, ड. सविता बिराजदार, ड. राहुल गायकवाड यांच्या मार्फत अपील दाखल केले. या प्रकरणात रेल्वेने कोणतेही नैसर्गिक न्यायतत्त्व पालन न करता कोणतीही संधी न देता सदर पाडकाम काढून टाकण्यासंबंधीची नोटीस दिली होती. हा आदेश संपूर्णत: बेकायदेशीर असून यदाकदाचित ही नोटिसीप्रमाणे कारवाई झाल्यास ४० वर्षांपासून राहणाऱ्या रहिवाशांचे अतोनात व कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे, असा युक्तिवाद ड. अमित आळंगे यांनी केला. हा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. शब्बीर अहमद औटी यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना नोटीस काढून दि. ५ जून २०२३ रोजी न्यायालयात हजर राहण्याबाबत आदेश केला. तोपर्यंत कोणतेही पाडकाम अथवा निष्कासन करण्याबाबतची कारवाई करू नये, असा मनाईचा आदेश दिला आहे. या प्रकरणात ड. व्ही. एस. आळंगे, ॲड.अमित आळंगे, ॲड. बिराजदार,ॲड. राहुल गायकवाड यांनी काम पाहिले.

## जि.प.चे शेकडो शिक्षक अतिरिक्त होण्याच्या मार्गावर

### आधार कार्ड अपडेट नसल्याने विद्यार्थ्यांना बसणार फटका

✔ सुराज्य/सोलापूर

जि.प.च्या प्राथमिक शिक्षण विभागातील शेकडो शिक्षक अतिरिक्त होण्याच्या मार्गावर आहेत. तर अद्याप आधार कार्ड अपडेट केले नसल्यामुळे ६ हजार विद्यार्थ्यांना फटका बसणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाकडून



देण्यात आली. २०२२-२३ सालातील शिक्षक संच मान्यतेसाठी शासनाने वेळोवेळी मुख्याध्यपकांसह शिक्षकांना विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र या आदेशाकडे बहुतांशी शिक्षकांनी दुर्लक्ष केल्याचे आढळून आले आहे. आधार अपडेटचे आत्ता पर्यंत ८०% कामकाज पुर्ण झाले आहे. अकलकोट ७१.२०, बार्शी ७९.५२, करमाळा ७३.२८, माढा ७७.९७, माळशिरस ८२.४५, मंगळवेढा ८१.२९, मोहोळ ७८.६९, पंढरपूर ७८.९९, सांगोला ८२.५१ उत्तर सोलापूर ७७.३% दक्षिण सोलापूर ८९.६६, सोलापूर युआरसी (एक) ८२२८, सोलापूर युआरसी (दोन ) ७६.१० आशी टक्केवारी १४ मे पर्यंत प्राथमिक शिक्षण विभागाकडून निश्चीत करण्यात आली आहे.

### आराखडा सुरू करण्याचे नियोजन सुरू

प्राथमिक शिक्षण विभागाचा नवीन उपक्रम लवकरच प्रायोगिक तत्त्वावर हाती घेण्यात येणार आहे. एलकेजी, युकेजीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय जि.प.ने घेतला आहे. १०० शाळेत प्राथमिक टप्यात उपक्रम करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जि.प. शिक्षक नेमण्यात येणार आहेत. यासाठी आराखडा तयार करण्याचे कामकाज सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## मुलाच्या डोक्यात घातला दगड

✔ सुराज्य/सोलापूर

पगार न दिल्याने कामावर न गेलेल्या मुलाला दमदाटी करत डोक्यात दगड घालून जखमी केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत कोळी यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी सुनकप्पा शेट्टेप्पा कोळी (वय-४२,रा.शितल नगर, सोरेगाव) यांचा मुलगा अनिल आरोपी महेश चौगुले यांच्या शेतात गुरे राखण्याचे काम करत होता. दोन ते तीन महिन्यांपासून पगार न दिल्याने अनिल हा आपल्या घरी राहू लागला. दरम्यान, आरोपी महेश चौगुले व अमोल भरले हे अनिल यांच्या घरी येऊन तु काम सोडून का आला असे म्हणत शिवीगाळ करू लागला. यावेळी कोळी यांच्या पत्नीने मुलाला कामास पाठविण्यास विरोध केला.त्यावेळी त्यांनाही शिवीगाळ केली. तसेच यावेळी आरोपींनी कोळी यांना मारहाण करून जखमी केले.

# सर्व्हेक्षणानंतर महापालिकेच्या उत्पनात होईल वाढ

## महापालिकेने आता पाणीपुरवठ्यासह नागरीसुविधांकडेही लक्ष देण्याची गरज

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या वतीने १५ मे पासून शहरातील सर्वंकष सर्वेक्षणाला सुरुवात झाली आह. शहर विकासासाठी हा सर्व्हे महत्त्वाचा मानला जात आह. एका बाजूला या सर्व मुळे महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे तर दुसरीकडे नागरिकांवर मात्र कराचा अतिरिक्त बोजा पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पालिकेचे उत्पन्न यामुळे वाढणार असले तरी पुढील काळात पाणीपुरवठ्यासह इतर नागरी सुविधा महापालिका आता तरी सक्षमपणे देणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वास्तविक पाहता शहरातील मिळकतींचे रिविजन दर चार वर्षांनी महापालिकेने करून घेणे बंधनकारक आहे. परंतु मागील २८ वर्षांपासून रिविजनच झाले नसल्याचे मागे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उघडकीस आले होते. तरी देखील तत्कालीन आयुक्त शिवशंकर यांनी शहरातील जवळपास ४५ हजार मिळकतदारांना वाढीव कराच्या नोटिसा पाठवल्या होत्या. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या विरोधामुळे अखेर ४५ हजार नोटीसा रद्द करण्याची नामुष्की महापालिका प्रशासनावर ओढावली होती.

बोगस नळ आणि शहरातील जवळपास निम्म्या घरांना नळ कनेक्शनच नसल्याचे वॉटर ऑडिट मधून लक्षात आल्यामुळे आता महापालिका प्रशासन पुन्हा एकदा शहरातील मिळकतींचा सर्वे आणि रिविजन करत आह. महापालिकेच्या जवळपास २६३ कर्मचाऱ्यांच्या पथकांकडून १५ मे पासून शहरात मिळकतींचा सर्व्हे सुरू आहे. हा सर्वे तरी पारदर्शी आणि प्रामाणिकपणे होऊन शहरातील



मिळकतींसह नळ कनेक्शनची पारदर्शक माहिती महापालिकेला मिळेल अशी आशा आहे. शहरातील अनेक नागरिकांनी विनापरवाना बांधकामे केली आहे तसेच अनेकांची नळ कनेक्शन ही बेकायदेशीर आहे हे सर्व आता सर्वेक्षणामधून उघड होणार आहे. या सर्व बाबी आता रजिस्टरमध्ये नोंद मध्ये होणार आहे. हे सर्व कायदेशिर होऊन महापालिकेचे उत्पन्न वाढणार आहे. आता महापालिकेने नागरिकांच्या सोयीसुविधेकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### हा तरी सर्व्हे यशस्वी होणार का?

यापूर्वी शहरातील मिळकतींचा सर्वे करण्यासाठी महापालिकेने काही वर्षांपूर्वी सायबरटेक या कंपनीला सुमारे पाच कोटी रुपयांचा मक्ता दिला होता. हा सर्व्हे अर्धवट राहिल्यामुळे तत्कालीन आयुक्त अविनाश ढाकणे यांनी महापालिकेचे मनुष्यबळ देऊन सर्व्हे पूर्ण केला होता. तरी देखील आता पुन्हा शहरातील मिळकतींचा महापालिका कर्मचाऱ्यांच्याद्वारे सर्व्हे करण्यात येणार आहे. मागील इतिहास पाहता हा तरी सर्व्हे यशस्वी होणार का ? अशी शंका व्यक्त होत आहे.

### लोकप्रतिनिधी म्हणतात पाणीपुरवठ्याकडे लक्ष द्या

मिळकत करायचा सर्वे महत्त्वाचा आहे मात्र सध्याच्या परिस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत करण्याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. सध्या शहरातील अनेक भागात सहा ते सात दिवसात पाणी येत आहेत. या या विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे गेल्या आठ दिवसात दोन बळी गेले आहे. त्यामुळे महापालिकेने आपली ही सर्व यंत्रणा सध्या पाणीपुरवठा सुरळीत करण्याकडे लावली तर चांगले होईल अशी प्रतिक्रिया अनेक माजी लोकप्रतिनिधी व्यक्त करत आहेत.





## बार्शी तालुक्यातील हातभट्ट्यांवर धाडी टाकून दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

✔ सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांच्या पथकांनी बुधवारी सकाळच्या सुमारास बार्शी तालुक्यातील हातभट्ट्यांवर धाडी टाकून दीड लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी बुधवारी बार्शी तालुक्यातील भातंबरे, यमाई तांडा याठिकाणी सकाळच्या सुमारास संयुक्तपणे धाडी टाकल्या. धाडीत गावठी दारु निर्मितीच्या भट्ट्या नष्ट करुन ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. हातभट्टी चालक व जागा मालकांचा शोध घेण्यात येत आहे. या कारवाईत ७२०० लिटर गुळमिश्रीत रसायन, लोखंडी भट्टी बॅरल, प्लॅस्टिक बॅरल व ५० लिटर हातभट्टी दारु जप्त करुन जागीच नष्ट करण्यात आली. विभागाने १ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ही कारवाई निरीक्षक सदानंद मस्करे, सुनील कदम, गुलाब जाधव, दुय्यम निरीक्षक सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, रोहिणी गुरव, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, जवान योगीराज तोग्गी, वसंत राठोड, इस्माईल गोडीकट, अनिल पांढरे, प्रशांत इंगोले, वाहनचालक रशिद शेख व धाराशिव जिल्हा येथील अधिकारी कर्मचाऱ्यांनी पार पाडली.